महाराष्ट्र शासनाचा २००३–२००४ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी गुरुवार, दिनांक २० मार्च २००३ रोजी
केलेले भाषण

## भाग पहिला

महोदय,

आपल्या अनुमतीने सन २००३-०४ या वर्षाचा अर्थसंकल्प मी सभागृहास सादर करीत आहे.

मानव विकासात राज्याची आघाडी.

१. ऑक्टोबर, १९९९ मध्ये सत्तेवर आल्यापासून लोकशाही आघाडी सरकारने राज्यामध्ये सर्वांगिण विकास व दारिद्रय निवारण करण्याची बांधिलकी प्रदर्शित केलेली आहे. गेल्या तीन वर्षातील आर्थिक व मानव विकास निर्देशांकावरुन आमच्या प्रयत्नांना फळे आल्याचे दिसून येते. स्थिर किंमतीवर आधारीत राज्याच्या सकल घरेलू उत्पादनात सन १९९९-२००० मधील रुपये १,६२,६८० कोटी वरुन सन २००२-२००३ मध्ये रुपये १,८७,५२१ कोटी इतकी म्हणजे १५.२७ टक्के वाढ झालेली आहे. ही वाढ संपूर्ण देशामध्ये उच्चत्तम असून वाढीच्या दरांच्या तुलनेतही सर्वोच्च आहे. सन २००२ च्या मानव विकास अहवालातील मानव विकास निर्देशांकानुसार महाराष्ट्र हे देशातील प्रमुख राज्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या काही वर्षात राज्य शासनाने गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर दिलेला भर आणि धोरणे राबविताना सर्वसामान्य माणसाला रोजगाराची व सामाजिक सुरक्षिततेची दिलेली खात्री यामुळेच हे शक्य झालेले आहे.

राजकोषीय स्थिरतेकडे

२. या सन्माननीय सभागृहात गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करीत असतांना राज्याला आर्थिक स्थैर्य देण्यासाठी सुधारणा कार्यक्रम अंमलबजावणीचा निग्रह शासनाने व्यक्त केला होता. तसेच मध्यम मुदत राजकोषीय सुधारणा कार्यक्रमाचा भाग म्हणून राज्य शासनाने काही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये, प्रचलीत पद्धतीपासून वेगळी धोरणे स्विकारण्याची आवश्यकता असल्याचे मी नमूद केले होते. राज्य शासनाने त्या अनुषंगाने घेतलेल्या पुढाकारामुळे राजकोषीय स्थिरतेकडे राज्य वाटचाल करीत आहे. या कार्यक्रमाचे शेवटचे वर्ष हे सन २००४-०५ असून तोपर्यंत राज्यास आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल असा माझा विश्वास आहे. आपणास विदीत आहे की, यासाठी शासनाला काही कटू व राजकीय दृष्टया काहीसे अप्रिय निर्णय घ्यावे लागले. शासनाने घेतलेल्या निर्णयांचा तपशिल सादर करण्यापूर्वी मी मध्यम मुदत राजकोषीय सुधारणा कार्यक्रम हाती घेतल्यानंतर राज्य शासनाच्या प्रयत्नांना आलेल्या यशाबाबत थोडक्यात माहिती देऊ इच्छितो.

महसूली तूटीत घट.

३. सन २०००-०१ मध्ये महसूली तूट रुपये ५,२२४ कोटी होती. ती सन २००१-०२ मध्ये रुपये ८,१८९ कोटी अशी ५६.७६ टक्के इतकी वाढली. हे केवळ खर्चातील वाढ व महसूलामध्ये घट या दोन्ही कारणांमुळे झाले होते. मी सभागृहास सांगू इच्छितो की, शासनाने अवलंबिलेल्या महसूल वाढीच्या आणि खर्च नियंत्रित करण्याच्या वेगवेगळया उपाययोजनांमुळे यावर्षी महसूली तूट गतवर्षीच्या रुपये ८,१८८ कोटी वरुन रुपये ७,६१९ कोटी म्हणजे रुपये ५६९ कोटींनी कमी होण्याची अपेक्षा आहे. सन २००२-०३ मध्ये महसूल वाढीचा दर १३.५१ टक्के इतका आहे. सदरहू दर मागील ५ वर्षांच्या ९.३३ टक्के

इतक्या एकत्रित वार्षिक वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे. महसूली खर्चातील वाढ सन २००१-०२ मध्ये २.३५ टक्क्यांवर नियंत्रित करण्यात आली होती. सन २००२-०३ मध्ये ती ९.१ टक्के आहे. मात्र सदर वाढ गत ५ वर्षातील एकत्रित वार्षिक वाढीच्या १३.२२ टक्के या दरापेक्षा बरीच कमी आहे. राज्य शासनाने राजकोषीय स्थिरतेकडे उचललेले पहिले पाऊल यशस्वी झाल्याचे यावरुन स्पष्ट होते. आघाडी शासनाचा सध्याचा कार्यकाळ संपेपर्यंत अर्थसंकल्पबाहय कर्ज उभारल्याने निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीतून राजकोषिय सुधारणा कार्यक्रमाद्वारे बाहेर पडण्याचा शासनाचा निर्धार आहे.

महसूली जमा

४. सन २००१-०२ मधील रुपये ३०,०९२.९५ कोटीच्या महसूलाच्या तूलनेत १३.५९ टक्के इतका म्हणजेच रुपये ३४,१८२.१६ कोटी एवढा महसूल सन २००२-०३ मध्ये वाढलेला आहे. केवळ आर्थिक स्थितीमध्ये हळूहळू सुधारणा होत आहे म्हणून नव्हे तर कराच्या दरामध्ये आणलेल्या सुसुत्रतेमुळे व शासनाने करवसूलीच्या बाबतीत केलेल्या प्रशासकीय उपयायोजनांमुळे ही वाढ शक्य झालेली आहे. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या केंद्रीय करातील राज्याच्या हिश्श्याचे करमहसूलाशी असलेले प्रमाण सन २००१-०२ मध्ये १०.३२ टक्क्यांवरुन सन २००२-०३ मध्ये ९.८३ टक्के असे घटल्यानंतरही सदर वाढ शक्य झालेली आहे. राज्य शासनाच्या करसंकलनाच्या प्रयासाची ही फलनिष्पत्ती आहे. तसेच महाराष्ट्र राज्याचा बळकट वित्तीय पाया यातून प्रतित होतो. मुंबईच्या आर्थिक सुबत्तेवर आधारीत आकडेवारीवरुन केंद्र शासन व अकराव्या वित्तीय आयोगाने केंद्र शासनाकडून मिळणा-या निधीचा हिस्सा ६.१२६ टक्क्यांवरुन ४.६३२ टक्के इतका खाली आणला असून त्यामुळे आयोगाच्या

५ वर्षांच्या कालावधीत रुपये ५,६०० कोटीने राज्याचा वाटा कमी झाला आहे. ही बाब मी विविध पातळीवर मांडीत आलेलो आहे व आता बाराव्या वित्त आयोगासमोर निग्रहाने मांडण्याचा माझा निर्धार आहे. येथे एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की, केंद्र शासनास महाराष्ट्रातून त्यांच्या महसूलाच्या २५ टक्के वाटा मिळतो. मात्र केंद्रीय कराच्या संकोषातून निधी वाटप करताना केवळ ४.६३ टक्के रक्कम महाराष्ट्राला मिळते.

वेतन विषयक खर्च.

५. महसूलाचा मोठा हिस्सा वेतन व व्याजावर खर्ची पडत असल्याने नियमित प्रशासकीय कामकाज व विकासासाठी खर्चात घट झाल्याचे आपणांस ज्ञात आहेच. वेतन विषयक खर्च कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्या यशस्वी होण्यात कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या संघटनांनी महत्वपूर्ण व विधायक भूमिका बजावलेली आहे. या उपाययोजनांमुळे आमच्या सरकारने सन २०००-०१ च्या रुपये १८१८८ कोटी व सन २००१-०२ मधील रुपये १७४५७ कोटी एवढया खर्चाच्या तुलनेत सन २००२-०३ मध्ये रुपये १७८६६ कोटी इतक्याच मर्यादित ठेवण्यात यश मिळविले आहे. या बचतीमुळे महसूली तूट कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे. इथे मी हे प्रकर्षाने नमूद करू इच्छितो की सन १९९८-९९ मध्ये जो वेतनविषयक खर्च महसूलाच्या उत्पन्नाच्या ६९ टक्के इतका होता, तो सन २००२-०३ मध्ये ५२ टक्क्यांवर येऊन पोहोचला आहे.

कर्ज परतफेड

६. राज्याच्या वाढत्या कर्जाच्या बोजाचा प्रश्न आपणां सर्वांनाच भेडसावत आहे. सन २००२-०३ मध्ये व्याजाचे दायित्व रुपये ९,०४३ कोटी इतके वाढले आहे. या ठिकाणी एक गोष्ट प्रकर्षाने ध्यानात घेतली पाहीजे ती म्हणजे कर्जरोखे वगळता

रुपये ६९,८०० कोटी कर्जापैकी रुपये ३३,१७६ कोटी इतके कर्ज केंद्र शासन व केंद्र शासनाच्या संस्थांचे आहे. सदर कर्ज सरासरी ११.५ टक्के एवढया व्याजदराचे आहे. सन २००२-०३ मध्ये राज्याच्या साधनसंपत्तीतून केंद्र शासनास व्याजापोटी रुपये ४,१६७ कोटी देण्यात आले आहेत. व्याजाचा दर कमी करण्याबाबत आम्ही केंद्र शासनास विनंती केली असून, त्यास होकारार्थी प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे. सन २००२-०३ मध्ये राज्य शासनाने केंद्र शासनाला रुपये १,११० कोटी, वित्तीय संस्था व बँकांना रुपये २६८ कोटी व कर्जरोख्यांची रुपये ५५२ कोटी एवढी परतफेड केली आहे. या वर्षीच्या महसूलातून जुने व महागडे कर्ज फेडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला आहे. केंद्र शासनाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून राज्यांसाठी त्यांचे कर्ज परत फेडण्यासाठी खुल्या बाजारातून कर्ज उभारणीची मुभा दिल्याच्या या कार्यक्रमातून महाराष्ट्र बाहेर राहिल्यानंतरही जुने व महागडे कर्ज परतफेड करण्यात राज्य यशस्वी झालेले आहे. वस्तुतः मागील तीन वर्षाच्या कालावधीत लोकशाही आघाडीच्या सरकारने व्याज व मुद्दल धरून रुपये २७,३२० कोटी इतक्या रकमेची परतफेड केल आहे. कर्ज परत फेडत असताना कंबर कसावी लागली, त्यामुळे सरकार आणि सरकार बाहेरील सर्वांनाच काही प्रमाणात त्याग करावा लागला आहे. भारतीय संघराज्याचा घटक या नात्याने आमचे शासन आपल्या कर्ज उभारणी कार्यक्रमाशी प्रामाणिक आहे आणि त्याबाबत सर्व जबाबदारी पार पाडण्यास इच्छूकच नव्हे तर पूर्णपणे सक्षम आहे याची मी या सभागृहास ग्वाही देवू इच्छितो.

अर्थसंकल्पीय अंदाज २००३-०४

७. सन २००३-०४ साठी महसुली जमा रुपये ३८,२९३.४५ कोटी अंदाजित करण्यांत आली आहे तर महसुली खर्च

रुपये ४२,८३४.५५ कोटी अंदाजित केलेला आहे. परिणामस्वरुप महसुली तूट रुपये ४,५४१.०९ कोटी इतकी येईल. सन २००३-०४ मध्ये राजकोषीय तूट रुपये ९,३७४.४५ कोटी इतकी अंदाजित आहे. मध्यम मुदत राजकोषीय सुधारणा कार्यक्रमाच्या विविध उपायांच्या माध्यमातून कर्ज उभारणी मर्यादीत ठेवण्याचे माझे प्रयत्न सतत चालू राहतील.

राजकोषीय सुधारणा कार्यक्रम - अहवाल

८. गतवर्षी घोषित केलेल्या राजकोषीय सुधारणा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी उचललेल्या विविध पावलांसंबंधी आता मी सभागृहास माहिती देऊ इच्छितो.

राजकोषीय सुधारणा विधेयक

९.१ नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्प व्यवस्थापन विधेयक सभागृहास सादर केल्याचे आपणास माहित आहेच. या विधेयकातील विविध तरतूदींवर व्यापक चर्चा व्हावी असे मला वाटते. लोकनियुक्त शासन व्यवस्थेमध्ये आर्थिक शिस्त आणण्यासाठी कायदेशीर चौकटीची आवश्यकता आहे हे जगभर मान्य झाले आहे. केंद्र शासनाने सुध्दा अशाच प्रकारचे विधेयक संसदेला सादर केले आहे. हे विधेयक तयार करून विधीमंडळात मांडणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिल्या तीन राज्यांपैकी आहे. महाराष्ट्राची इतर राज्यांना मार्गदर्शनाची परंपरा या बाबतीतही चालू ठेवण्यात आपण मागे राहणार नाही याचा मला विश्वास आहे.

शासन थकहमी

९.२ सार्वजनिक उपक्रम, सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूत गिरण्या, बँका इत्यादींना दिलेल्या शासन थकहमीमुळे येणारे संभाव्य दायित्व हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. अशा उपक्रमांची परतफेडीची क्षमता विचारात न घेता हमी देण्याच्या भूतकाळातील पद्धतीमुळे शासनाचे संभाव्य दायित्व वाढू शकते. गतवर्षी मी

केवळ पतवाढीसाठी किंवा वर्धनक्षम प्रकल्पांसाठी मर्यादित अशा प्रकरणांमध्ये सार्वजनिक उपक्रमांना हमी देण्याचे धोरण घोषित केलेले होते. त्याचबरोबर मी असेही स्पष्ट केले होते की, सहकार क्षेत्रातील नवीन वाणिज्यिक प्रकल्पांना यापुढे हमी दिली जाणार नाही व त्यांनी स्वबळावर निधी उभारणे अपेक्षित आहे. मला हे सांगण्यास आनंद होतो आहे की, उपरोक्त दोन्ही बाबतीत सन २००२-०३ मध्ये दिलेला शब्द पाळण्यात मी यशस्वी झालेलो आहे. सार्वजनिक उपक्रमांना हमी देत असतांना ते त्यांच्या वाढीव उत्पन्नातून कर्ज परतफेड करतील आणि अशा हमीमुळे शासनावर दायित्व येणार नाही अशी प्रकरणे वगळता सार्वजनिक उपक्रमांना हमी देण्यात आलेली नाही. परिणामस्वरुप वर्षभरात शासन हमी मर्यादित राहीली व त्यामुळे यावर्षी प्रथमच देण्यात आलेल्या हमीपेक्षा परतफेड झालेली हमी जास्त असल्याने एकूण थकीत हमीची रक्कम कमी झालेली आहे. सहकार क्षेत्रातील नवीन प्रकल्पांना हमी देण्यात आलेली नाही, केवळ आधिच मंजूर झालेल्या प्रकरणांमध्ये हमी देण्यात आली आहे.

उर्जा क्षेत्रातील सुधारणा

९.३ आमचे सरकार ऊर्जा क्षेत्रावर श्वेतपत्रिका काढेल असे मी गेल्यावर्षी आश्वासन दिले होते. त्यानुसार जारी केलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला अडचणीच्या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी तपशीलवार कार्यक्रम तयार करण्यांत आला आहे. ही श्वेतपत्रिका कर्मचारी संघटनांसह सर्व संबंधितांशी केलेल्या चर्चेतून तयार झालेली आहे. विविध माध्यमातून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्रायांचा विचार करुन प्रारुप महाराष्ट्र विद्युत सुधारणा विधेयकात दुरुस्त्या करण्यांत आलेल्या आहेत. मंडळाच्या कर्मचारी संघटनांना विश्वासात घेवून मंडळाचा ताळेबंद सुधारण्याच्या कार्यक्रमास सुरुवात

केलेली आहे. राज्य शासनाने वीज मंडळाला दिलेले कर्ज भाग भांडवलात रुपांतरीत करुन ताळेबंद सुधारण्याच्या दृष्टीने निश्चित अशी पावले उचलली आहेत. तसेच परताव्याचा दर प्राप्त करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे निगमीकरण करण्यासाठी मंडळाचा ताळेबंद सुधारणे आवश्यकच आहे. मला आपणास सांगण्यात आनंद होतो की, दिनांक १ एप्रिल २००२ पासून सुरु होणाऱ्या पहिल्या सहामाही मध्ये कित्येक वर्षानंतर प्रथमच राज्य वीज मंडळाने रोकड अधिक्य प्राप्त (Cash Surplus) केलेले आहे. महाराष्ट्र ऊर्जा नियामक आयोगाने घातलेल्या मर्यादांच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य वीज मंडळ स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर वाटचाल करेल अशी मला अपेक्षा आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने शेतक-यांना शेतीपंपासाठी वीज बीलापोटी अनुदान देणे शासन चालू ठेवेल. मात्र, ते मध्यम मुदत राजकोषीय सुधारणा कार्यक्रमाच्या मर्यादेत राहील, हे मी येथे नमूद करु इच्छितो.

पाणी वापर संस्था

९.४ पाटबंधारे क्षेत्रामध्ये पाणी वाटप व व्यवस्थापनात शेतक-याच्या सहभाग असावा यादृष्टीने व्यापक प्रगती करण्यात आलेली आहे. राज्यामध्ये सध्या एकूण ३४६ पाणी वापर संस्था कार्यरत आहेत. त्यांचे माध्यमातून १,१३,९०७ हेक्टर इतक्या क्षेत्रावर सिंचन केले जाते. राज्यात आणखी १,१६३ पाणीवापर संस्था स्थापनेच्या विविध टप्प्यांवर आहेत. त्यांच्याद्वारे ३,५७,२४० हेक्टर क्षेत्राचे सिंचन व्यवस्थापन पाहिले जाईल. येत्या वर्षात हे काम जोमाने सुरु ठेवले जाईल.

कापूस खरेदी योजना

९.५ गतवर्षी मी माझ्या भाषणामध्ये नमूद केल्याप्रमाणे केंद्र शासनाने घोषित केलेल्या किमान आधारभूत किमतीनुसार कापूस पणन महामंडळ भारतीय कापूस महामंडळाच्या माध्यमातून

कच्च्या कापसाच्या बाजारात उतरले. सर्व सन्माननीय सदस्यांना माहितच आहे की, विदर्भामध्ये कापसाचे पीक यावर्षी चांगले आले नाही. त्यामुळे शेतक-यांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला, त्यामुळे कापूस उत्पादकांना दिलासा देण्याची मागणी सर्व स्तरातून समोर आली. तिचा विचार करुन ज्या शेतक-यांनी कापूस पणन महामंडळामार्फत त्यांच्या कापसाची विक्री केली आहे, त्यांना सुयोग्य योजनेव्दारे नुकसान भरपाई देण्याचा आमच्या सरकारने निर्णय घेतला. त्यासाठी मी आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. कापूस पणन महामंडळाने चालू वर्षी २५ लाख गाठी कापूस खरेदी केलेला आहे. गतवर्षी ही खरेदी १५५ लाख गाठी इतकी होती. सुदैवाने स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कापसाचे भाव सुधारत आहेत. त्यामुळे शासनाला यावर्षी फार मोठे नुकसान प्रस्तावित योजनेमुळे येईल असे वाटत नाही.

**शासकीय दुधयोजनांचे सहकारीकरण.**

९.६ दुधाच्या खरेदी व विक्री व्यवहारामध्ये होत असलेला तोटा विचारात घेवून गेल्या वर्षी शासनाने शासकीय दूध योजना निर्गुंतवणूकीच्या कार्यक्रमाव्दारे सक्षम सहकारी दूध संस्थांना देण्याचा मानस मी व्यक्त केला होता. मला आपणांस सांगण्यास आनंद होतो की, या दिशेने चांगली सुरुवात झाली असून लातूर आणि संगमनेर येथील शासकीय दूध योजना व कडेगाव येथील शीतकेंद्र निर्गुंतवणूकीव्दारे सहकारी दूध संस्थांना देण्यात आलेली आहेत. यामुळे दूध उत्पादकांना त्यांच्या दुधावर प्रक्रीया करुन त्याची विक्री बाजारभावानुसार करणे शक्य होईल व दूध उत्पादकांच्या हिताच्या दृष्टीने या विकसीत झालेल्या क्षेत्रातून बाहेर पडणे शासनाला शक्य होईल. सन २००३-०४ या वर्षातही आणखी काही शासकीय दुग्धशाळा व शितकरण केंद्रांचे

सहकारीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. या क्षेत्रात होणारा तोटा आणखी कमी होण्यास मदत होईल.

सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ

९.७ महाराष्ट्र राज्य उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतूदी) कायदा २००० हा दिनांक १६ ऑगस्ट २००१ रोजी अधिसूचित करण्यात आला. महाराष्ट्र राज्य उपक्रम पुनर्रचना मंडळ (कामकाज पध्दती) नियमावली २००१ दिनांक ८ जानेवारी २००२ रोजी अधिसूचित करण्यात आली. दिनांक १५ मार्च २००३ पर्यंत राज्य शासनाने सदर मंडळाकडे एकूण ८ संदर्भ केले. महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाच्या बाबतीत महामंडळाने हाती असलेले प्रकल्प पूर्ण करावेत व निर्गुतवणूकीकरिता पुन्हा यावे अशी शिफारस मंडळाने केली आहे. मॅफकोच्या बाबतीत पाच निविदाकारांची यादी केलेली असून, विचारविनिमयाची प्रक्रिया चालू आहे. चितळी आसवनीचे बाबतीत ऑगस्ट २००३ पर्यंत प्रक्रीया पूर्ण होईल. महाराष्ट्र भूविकास महामंडळ हे कंपनी कायद्याच्या कलम ५६० खाली बंद करण्याची शिफारस मंडळाने केलेली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बाबतीत पुनर्रचनेच्या अंतिम शिफारशी शासनास सादर झालेल्या आहेत. हाफकिन महामंडळाचे बाबतीत नवीन प्रकल्पांसाठी रुपये ७० कोटी लागणार असल्याने महामंडळाने सुयोग्य भागीदार घ्यावा अशी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या बाबतीत सुनावणी पूर्ण झालेली आहे व दिनांक १५ एप्रिल २००३ पर्यंत मंडळाचा आदेश अपेक्षित आहे. पुढील वर्षी मंडळ आणखी किमान १० शासकीय उपक्रम सुनावणीसाठी घेईल अशी अपेक्षा आहे.

प्रशासनाच्या आकारमानावर नियंत्रण.

१.८ सन २००२-०३ मध्ये प्रशासनाचे आकारमान कमी करण्याच्या दिशेने बरीच प्रगती झालेली आहे. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे पाठविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ३,३९७ वरुन ७,००० इतकी झालेली आहे. या प्रक्रियेमध्ये विभागांच्या प्रशासकीय आराखड्याचा व्यापक आढावा घेण्यात आला आहे. ब-याच विभागात पदे लक्षणीयरित्या कमी करण्यात आलेली आहेत. अतिरिक्त संवर्ग कक्षामधून पुनर्वाटपाने पदभरती केल्याने खर्चात लक्षणीय बचत झालेली आहे. वेतनासंबंधीच्या खर्चाचे महसूली उत्पन्नाशी प्रमाण सन १९९८-९९ साली ६९ टक्के होते ते सन २००२-०३ मध्ये ५१ टक्के इतके कमी आणण्यात आलेले आहे. याद्वारे सन २००२-०३ मध्ये प्रत्यक्षात रुपये २७९.२४ कोटींची बचत झालेली आहे. सन २००३-०४ मध्ये ही टक्केवारी ४९ टक्क्यांवर येईल अशी अपेक्षा आहे.

कोषागारांचे संगणकीकरण.

१.९ गेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मी राज्यातील कोषागारांचे संगणकीकरण करण्याचा कार्यक्रम घोषित केलेला होता. त्यामध्ये आम्ही उत्तम प्रगती साध्य केलेली असून, मला आपणास सांगण्यास आनंद होतो की, कोषवाहीनी ही वेबसाइट आता इन्ट्रानेटवर वापरासाठी उपलब्ध झालेली आहे. सिंधुदूर्ग ते गडचिरोली अशी सर्वच कोषागारे व उपकोषागारे मुंबईशी जोडणे शक्य झाले आहे. या माध्यमातून प्रमाणक निहाय व चलन निहाय माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे, विविध प्रकारचे अहवाल आता प्राप्त करुन घेणे शक्य झालेले आहे. या सुविधेमुळे मंत्रालयीन विभागांना त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीवर संपूर्णपणे नियंत्रण आणण्याची सुविधा प्राप्त झालेली आहे. कोषागारांच्या कामकाजामध्ये पारदर्शकता, अचुकता आणि लेख्यांच्या मेळ्याचा वेग त्यातून प्रतित होतो. राष्ट्रीय माहिती

केंद्राच्या (एन.आय.सी.) कार्यगटाचे व वित्त विभागातील लेखा व कोषागारे संचालनालयाच्या कर्मचा-यांचे हे उत्कृष्ट काम निश्चितच वाखाणण्याजोगे आहे.

सहकारी क्षेत्रातील आजारी घटक.

**९.१०.** सहकार क्षेत्र जे महाराष्ट्रात भूषण आणि सहकाराद्वारे शेतकऱ्यांच्या दारापर्यंत औद्योगिक व तांत्रिक विकासाची फळे पोचलेली आहेत. हे क्षेत्र जागतिक स्पर्धेसाठी आता हळुहळु तयार होत आहे. गतवर्षी मी प्रतीपादीत केले होते की, साखर व सूत गिरणी क्षेत्रांमध्ये गरजेपेक्षा अधिक क्षमतेची काळजी घेण्याची आवश्यकता आहे कारण की वाढीव क्षमतेमुळे चांगल्या प्रकल्पांवर प्रतिकूल परिणाम होतो. अवर्धनक्षम घटक शीघ्रतेने अवसायानात निघणे आवश्यक आहे. चालू वर्षात एकूण ११ साखर कारखाने अवसायानात काढलेले आहेत. त्यापैकी ६ साखर कारखान्यांकडून मूल्यांकन प्राप्त झालेले आहे. याबाबतीत सर्व कार्यवाही जून पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

वार्षिक योजना २००३-०४.

**१०.** मला असा विश्वास आहे की, आम्ही उचललेल्या पावलांमुळे आता राज्य शासनाची साधनसंपत्ती समाजातील अती गरजू व गरीबांच्या कारणी लावण्याची योग्य वेळ आलेली आहे. भौतिक मुलभूत सुविधांमध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे सामाजिक मुलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध होवू लागलेला आहे. हे सरकार या संधीचा योग्य तो वापर करु इच्छिते. सन २००३-०४ साठी रुपये १२,६५० कोटींची वार्षिक योजना निश्चित करण्यात आलेली असून गतवर्षीच्या रुपये ११,१३५ कोटींपेक्षा तिचे आकारमान ११.९७ टक्क्यांनी जास्त आहे. सध्या ती योजना आयोगास पाठविण्यात आलेली आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या विशेषत्वाने निदर्शनास आणू इच्छितो की योजना व योजनेतर तरतुदींमध्ये सामाजिक सेवा, प्राथमिक शिक्षण, प्राथमिक

आरोग्य व गरीबांसाठी घरे यास मोठ्या प्रमाणावर नियतव्यय दिलेला आहे. त्यातही प्रकर्षाने नोंद घेण्याची बाब म्हणजे सामाजिक क्षेत्रातील आदिवासी विकास, महिला व बाल विकास या घटकांकडे विशेष लक्ष पुरविण्यात आलेले आहे. मी याबाबत सभागृहास विस्तृतपणे माहिती देवू इच्छितो.

"प्रकल्प एकसंघ" (प्रोजेक्ट युनाइट).

११. गेले वर्षभर शासनाने मध्यम मुदत राजकोषिय सुधारणा कार्यक्रमावर आपले सर्व लक्ष केंद्रित केलेले होते आणि ते असेच चालू राहिल असा या शासनाचा निर्धार आहे. जशी अतिरिक्त साधनसंपत्ती उपलब्ध होईल तशी ती गाभाक्षेत्राकडे, जेथे तिची आत्यंतीक गरज आहे तेथे वळविली जाईल. सामाजिक न्याय ही शासनाची प्रमुख जबाबदारी आहे असे या सरकारचे मत आहे. गेल्या दोन वर्षामध्ये राज्याच्या आर्थिक ओढाताणीची बाब ही मुख्यत: चर्चिली जात होती. त्याचवेळी आमच्या सरकारमधील काहीजण महाराष्ट्राचा पहिला मानवी विकास अहवाल तयार करण्यासाठी मेहनत घेत होते. योजना आयोग व संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाशी विचारविनिमय करुन तयार करण्यात आलेल्या या अहवालात राज्यातील मानव विकासाच्या विविध बाबींच्या स्थितीचे सखोल विश्लेषण केलेले आहे. सामाजिक व आर्थिक न्याय साध्य करण्यासाठी व भविष्यातील नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन देणे हे या अहवालाचे प्रमुख उदिष्ट आहे. अहवालाच्या या उद्दिष्टाचा धागा पकडून "दारिद्र्य व वंचितता" यावर लढा करण्याचे आमच्या सरकारने निश्चित केले असून त्याची सुरुवात म्हणून "**मानव विकासासाठी अर्थसंकल्प**" ही प्रक्रीया सुरु केलेली आहे. त्या दृष्टीने आमच्या शासनाने सामाजिक न्यायाची व्यापक व्याख्या करण्याचे ठरविले आहे व त्यातून सामाजिक न्याय निर्देशांकाचे तत्व ठरवून

" प्रकल्प एकसंघ " (Project Unite) नांवाने योजना तयार करुन अंमलबजावणीत आणण्याचे ठरविलेले आहे. या कार्यक्रमाव्दारे कमकुवत व समाजातील वंचित घटकांच्या गरजांकडे प्रामुख्याने लक्ष पुरवून त्यांना दारिद्रय, वय, लिंग, आरोग्य, व्यवसाय, ठिकाण व जात यामुळे आलेला दुरावा नष्ट करणे व अशा घटकांना मुळ प्रवाहात आणून सक्षम करण्याचा प्रयत्न या योजनेतून करण्यात येणार आहे.

भारतासारखाच महाराष्ट्र हा वैविध्यपूर्ण समाजघटकांनी बनलेला आहे. त्यामध्ये अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व त्याअंतर्गत असंख्य जाती व उपजाती, गट व उपगट आहेत. हा बहुतांश समाज पददलित आहे. गावोगावी हिंडणारे गावमागते, वासुदेव, भराडी, वैदु, कोल्हाटी, चित्रकथी, गोपाळ, गोंधळी, भोपे, भूते, मरगम्मावाले, किंप्रीवाले, जोगी, मसणाजोगी, कुडमुडेजोशी, माकडवाले, अस्वलवाले, दरवेशी, सापवाले, मरीआईवाले, झापटोपल्या वळणारे कैकाडी, माती उचलणारे वडार, गाव पारधी, टकारी, कांजारभाट, रामोशी, छप्परबंद, अशा कितीतरी लोकांना पिढ्यानपिढ्या समाजाच्या मुख्य प्रवाहात घेता आले नाही. त्यांना शासनाच्या कोणत्याही सवलतीचा फायदा झाला नाही व त्यांच्या घरातील कोणीही शाळेचा हुंबरा पाहीला नाही अशा समाजाचा विचार करण्याची गरज आहे.

१२. राज्याचा अर्थसंकल्प हा शासनाचे धोरण ठरविण्याचा प्रमुख दस्तऐवज असल्यामुळे समाजातील विभाजनाच्या प्रक्रियेवर हल्ला चढविण्याचे शासनाचे धोरण त्यामध्ये विहित होणे आवश्यक आहे. त्या विभक्तीकरणाचे प्रमुख कारण दारिद्रय हे असून त्याची लोकसंख्येच्या मोठया भागास झळ पोहचत आहे. जागतिक बँकेने शासनाच्या वित्तीय स्थितीच्या अभ्यास अहवालात दारिद्रय

निवारणासाठी अर्थसंकल्पाचे पुनर्घटन करण्यावर जोर दिला आहे. म्हणूनच या अर्थसंकल्पाचा भर दुर्लक्षित घटकांच्या शोषणावर आघात करणे, त्यांना त्यांची क्षमता जाणवून देणे व क्षमतेचा वापर करण्याची जिद्द निर्माण करुन आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी आवश्यक बळ देण्यावर आहे.

**१३.१** "प्रकल्प एकसंघ" हा सामाजिक न्यायाच्या अर्थशास्त्रावर आधारलेला आहे. या संकल्पनेमध्ये दुर्बलांचा विकास हाच विकासाचा चालक गृहीत धरलेला आहे. सामाजिक विकासासाठीची गुंतवणूक हे दान अथवा सामाजिक सुरक्षा म्हणून समजली न जाता ती सामाजिक आर्थिक परतावा देण्याची क्षमता असलेली गुंतवणूक आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या विचारांनुसार आमचे शासन "प्रकल्प एकसंघ" द्वारा विकासात्मक नियोजनासोबत सामाजिक न्याय देण्याची व्यवस्था उभारेल. या प्रकल्पास तात्वीक व भौतिक बाजू असतील. त्यापैकी तात्वीक बाजू ही भौतिक बाबीस चालना देणारी ठरेल. नियोजनाच्या या तात्विक बाबींसंबंधी आमचे आघाडी शासन पुढील पावले उचलीत आहे.

सामाजिक उत्तरदायित्व विधेयक

**१३.२** राजकोषिय उत्तरदायित्व व सामाजिक उत्तरदायित्व या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे मान्य करुन सामाजिक न्यायाचे साधन म्हणून आमचे शासन सामाजिक उत्तरदायित्व विधेयक तयार करेल. सामाजिक उत्तरदायित्व साध्य करण्याकरीता राजकोषिय उत्तरदायित्व अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय ही घर, कार्यालय, सार्वजनिक ठिकाण, सेवा केंद्रे व नियामक संस्था या समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. राज्य घटनेत समता, बंधुता व प्रतिष्ठा याबाबत दिलेली

हमी साध्य करण्याकरीता सामाजिक उत्तरदायित्व विधेयक हे राजकोषिय उत्तरदायित्व कायद्यास सहाय्यभूत ठरेल. या कायदयामध्ये सामाजिक दरीचे परिमाण निश्चित करणे व ती दरी मिटविण्याचे नियोजनही असेल तसेच सामाजिक न्याय निर्देशांक ठरवणे, सामाजिक घटकांच्या जबाबदारीची निश्चिती करणे, कायद्यामध्ये पध्दती विहीत करण्याची बाब अंतर्भूत असेल त्याचबरोबर ती दरी मिटविण्याचे नियोजनही असेल. तसेच सामाजिक न्याय निर्देशांक ठरवणे, सामाजिक घटकांची जबाबदारी निश्चित करणे, सामाजिक न्यायाचे लेखापरिक्षण आणि योजनांमधील गळती, भ्रष्टाचार आणि विहित जबाबदारी टाळणा-यांना शिक्षा सुचविणे, या बाबींचा समावेश या कायद्यामध्ये असेल.

**सामाजिक न्याय दिन.**

**१३.३** दिनांक २६ जुलै हा राजर्षि शाहु महाराजांचा जन्मदिन प्रत्येक वर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जाईल. मानव विकास अहवालाच्या धर्तीवर सामाजिक न्याय अहवाल दरवर्षी तयार केला जाईल. सदर अहवालामध्ये, विविध सामाजिक दऱ्यांची व्याप्ती व कल, पूर्ण केलेली उद्दिष्टे व सामाजिक दऱ्या कमी करण्यासाठी प्रस्तावित कार्यवाही, कालबध्द कृती आराखडा आणि समाजावर त्याचा परिणाम या बाबी अंतर्भूत असतील. अहवाल तयार करण्याकरीता लागणाऱ्या माहिती संकलनासाठी नियोजन विभागात सामाजिक न्याय कक्षाची स्थापना केली जाईल. राज्यातील नामवंत समाजशास्त्रज्ञ व अर्थतज्ञांना या कामात सहभागी करुन घेण्यात येईल. सामाजिक न्याय निर्देशांक निश्चित करणे, त्यासाठीचे सखोल संशोधन, सर्वेक्षण, विविध प्रकारचे अभ्यास यांचा समावेश असलेल्या सामाजिक न्याय अहवालाच्या कामाकरीता अर्थसंकल्पात रुपये २५ लाखांची तरतूद करण्यात आलेली आहे.

फुले-शाहु-आंबेडकर पारितोषिक

१३.४ सामाजिक न्याय वृध्दीगत करण्यामध्ये संस्थांची महत्वाची भूमिका राहणार आहे हे लक्षात घेता सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात काम करणा-या संस्थांकरीता महाराष्ट्रातील सर्वोच्च प्रतिष्ठेचे पारितोषिक देण्याची आवश्यकता आहे. म्हणून आघाडी शासन सामाजिक न्यायाकरीता " फुले-शाहु-आंबेडकर पारितोषिक " सुरु करीत आहे. या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक संस्था, ग्रामीण स्थानिक संस्था, सेवाभावी संस्था, शासकीय विभाग व सहकारी संस्था यांच्यामधून निवड करुन दरवर्षी हे पारितोषिक देण्यात येईल. सदर पारितोषिक रुपये १ कोटींचे असेल.

१४.१ ' प्रकल्प एकसंघ ' गरिबांना मोठ्या प्रमाणात शिक्षण, आरोग्य सेवा व घरे पुरविण्यावर लक्ष केंद्रित करील.

१४.२ मागासवर्गीय प्रवर्गांना वसतीगृह सुविधा, निवासी शाळा व शिष्यवृत्ती या त्रिसुत्रीच्या माध्यमातून शिक्षण पुरविण्यात येईल. समाजातील वंचित राहिलेल्या सर्व घटक व वर्गांना या बाबी पुरविण्याचा प्रयत्न राहील.

मुलींना शिष्यवृत्ती

१४.३ समाजातील कमकुवत घटकातील मुलींना शिक्षण हा समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचा कणा असल्याचे माझे सरकार मानते. सध्या मागासवर्गीयामधील इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मुलींना प्रति महिना रुपये ३० इतकी शिष्यवृत्ती दिली जाते. इयत्ता ८ वी व त्यापुढील वर्गातून शिक्षण सोडून देणाऱ्या मुलींचे प्रमाण ५५ टक्क्याहून अधिक आहे. म्हणून इयत्ता ८ वी ते १० वी मधील ३ लक्ष विद्यार्थीनींकरिता ही शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येत आहे. शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा रुपये १०० अशी वाढविण्यात येत आहे. प्रकल्प एकसंघ च्या या भागाचा वार्षिक खर्च रुपये ३० कोटी इतका असेल.

यामुळे मुली समाजाच्या विकासात अधिक फलदायी भूमिका बजावू शकतील अशी आम्हाला आशा आहे.

**राजर्षी शाहू महाराज प्राविण्य पारितोषिक योजना**

१४.४ मोफत शिक्षण योजना व विद्यावेतन या शिक्षण चालू ठेवण्यासाठी आवश्यक असल्या तरी प्राविण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्याची नितांत आवश्यकता आहे. मागासवर्गीय कुटूंबातील विद्यार्थी व अपंग विद्यार्थी यांना इतरांच्या बरोबरीने स्पर्धा करण्यासाठी पुढीलप्रमाणे फायदे देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शालांत परिक्षेमध्ये प्राविण्य मिळविलेले आहे अशा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ३०० प्राविण्य अनुदान देण्यात येईल. शालांत परिक्षेत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत राज्यामध्ये सर्वसाधारण यादीत पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येकी रुपये २.५० लक्ष एवढी रक्कम देण्यात येईल. तसेच प्रत्येक शालांत परिक्षा मंडळातून पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यास रुपये १ लक्ष एवढी रक्कम देण्यात येईल. राज्यात सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रत्येकी रुपये ५० हजार देण्यात येतील. जिल्ह्यामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी रुपये २५ हजार देण्यात येतील. स्पर्धात्मक परिक्षा घेऊन मागासवर्गीय कुटूंबातील विद्यार्थ्यांपैकी १०० विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांचा देशातील उत्तमोत्तम व्यावसायिक अभ्यासक्रमाचा खर्च शासन करेल. रुपये २.५० लक्ष पर्यंत प्रतिवर्ष उत्पन्न असणाऱ्या कुटूंबातील १० विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेच्या माध्यमातून निवड करुन परदेशातील सर्वोत्कृष्ट विश्वविद्यालयात उच्च शिक्षणासाठीचा खर्च शासन करेल. यासाठी रुपये ६.५० कोटींचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराज प्राविण्य पारितोषिक योजना म्हणून ही योजना संबोधिली जाईल.

वसतीगृह क्षमतावाढ व अनुदान

**१४.५** सध्या राज्यशासन १९,०२८ विद्यार्थ्यांना सोईसवलती देणारी २४३ मागासवर्गीयांसाठी वसतीगृहे चालवित आहे. अशा वसतिगृहात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २० टक्के जागा ठेवलेल्या आहेत. ही वसतीगृहे अन्न, निवारा व शिक्षणासबंधी काही खर्च पुरवितात. परंतु या वसतीगृहांची क्षमता, विशेषत: व्यावसायीक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या बाबतीत, मागणीच्या तुलनेत अत्यंत अपुरी आहे. आमचे शासन वर्ष २००३-०४ मध्ये या वसतीगृहांची क्षमता ४,००० जागांनी वाढवील. त्याचबरोबर वसतीगृह सवलत देय असणा-या परंतु जागा उपलब्ध न झाल्यामुळे त्यापासून वंचित राहिलेल्या अंदाजे १७,००० विद्यार्थ्यांना रुपये ५०० ते रुपये १००० दरम्यान शिष्यवृत्ती देण्यात येईल. ही सुविधा अपंग विद्यार्थ्यांनाही उपलब्ध करून देण्यात येईल. या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पामध्ये रुपये १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

आश्रमशाळा

**१४.६** आश्रमशाळांची गरज व मागणी विचारात घेता मागासवर्गीयांसाठी मोठ्या प्रमाणावर आश्रमशाळा सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती यांकरिताचा प्राथमिक आश्रमशाळांचा अनुशेष १६९ इतका व मध्यम आश्रमशाळांचा अनुशेष १०२ इतका आहे. गेल्या काही वर्षात पुरेसा निधी उपलब्ध न झाल्यामुळे हा अनुशेष निर्माण झाला आहे. पुढील वर्षात विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरीताच्या आश्रमशाळांचा संपूर्ण अनुशेष भरुन काढण्याचा आघाडी शासनाने निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक तालुक्यात अनुसूचित जाती करिता एक आश्रमशाळा मंजूर करण्यात येईल. या वर्षी अपंगांकरीता काही शाळांना शासनाने

सहाय्यक अनुदाने मंजूर केलेली आहेत. वर्ष २००३-०४ मध्ये निकषांची पुर्तता करणाऱ्या उर्वरित शाळांनाही सहाय्यक अनुदाने मंजूर करण्यात येतील. या प्रयोजनार्थ रुपये ६.९५ कोटी एवढी रक्कम राखून ठेवण्यात आली आहे.

वसतिगृह श्रेणीवर्धन. **१४.७** आश्रमशाळा शिक्षणासाठी आवश्यक अशा सर्व बाबी पुरवितात मात्र वसतिगृहामध्ये या सर्व सुविधा पुरविल्या जात नाहीत. सर्वच वसतीगृहे आश्रमशाळांमध्ये अपेक्षेइतपत रुपांतरित करणे शक्य नाही. मात्र पुरेशा प्रमाणात सुसज्ज ग्रंथालये, पुरक शिकवण्या, खेळांच्या सुविधा व संगणक कक्ष देवून वसतीगृहांचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय आमच्या शासनाने घेतलेला आहे. या प्रयोजनार्थ रुपये २५ कोटी एवढा खर्च करण्यात येईल. या योजनेचा लाभ सुमारे १,१०,००० विद्यार्थ्यांना होईल.

पब्लिक स्कूल. **१४.८** राज्यातील चांगल्या आश्रमशाळांचे पब्लिक स्कुलच्या दर्जाइतपत टप्प्या टप्प्याने श्रेणीवर्धन करण्यात येईल. देशातील सर्वोत्कृष्ट खाजगी शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जानुरुप चांगल्या दर्जाचे शिक्षण या शाळांमधून दिले जाईल. नजीकच्या कालावधीत प्रत्येक जिल्ह्यात अशाप्रकारचे कमीत कमी एक पब्लिक स्कुल अपेक्षित आहे. या प्रयोजनार्थ सन २००२-०३ साठी मी रुपये ९ कोटींची तरतूद करीत असून यामधून ६ आश्रमशाळांचे रुपांतर पब्लिक स्कूलमध्ये करण्यात येईल. प्रत्येक विभागातील एक शाळा सन २००३-०४ या वर्षात यासाठी निवडण्यात येईल.

**१४.९** कमकुवत घटकांच्या अनुदानित शैक्षणिक संस्थांमधून इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम अनुज्ञेय करण्याचा आमच्या सरकारने निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय सध्याच्या संस्था व नवीन

संस्थांनाही लागू राहील. तसेच अपंग विद्यार्थ्यांसाठी निवडक संस्थांमधून शिक्षण आयोजित करण्यात येईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य योजना.** **१४.१०** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघीणीचे दूध म्हटले आहे. सन २००३-०४ पासून सर्व दुर्बल घटकातील शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थांचे वर्गीकरण करण्यात येईल. अशा प्रत्येक घटकातील संस्थांच्या कामकाजाच्या दर्जाच्या आधारे अनुदान देण्याची योजना विहित करण्यात येईल त्यामध्ये प्रोत्साहन व दंड दोन्हीचा अंतर्भाव असेल. राज्य पातळीवर उत्कृष्ट काम करणाऱ्या तीन संस्थांना रुपये ५ लक्ष, रुपये ३ लक्ष व रुपये २ लक्ष एवढे विशेष प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच विभागीय पातळीवरील संस्थेसाठी रुपये १ लाखाचे विशेष प्रोत्साहन देण्यात येईल. ज्या संस्था संधी दिल्यानंतरही सुधारणा दाखविणार नाहीत अशा संस्था बंद करण्यात येतील. या प्रयोजनार्थ रुपये १.०० कोटीची तरतूद केली आहे. सदर योजना “ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य योजना ” अशी संबोधण्यात येईल.

**पोहोच व्यवस्था.** **१४.११** प्रकल्प एकसंघाच्या अंमलबजावणीसाठी सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात रुपये १२५ कोटीची तरतूद सुचविलेली आहे. मात्र मला येथे असे नमूद करावेसे वाटते की गरिबांसाठीच्या सर्वच कार्यक्रमांमध्ये कमकुवत पोहोच व्यवस्था ही सगळ्यात महत्वाची समस्या आहे. आमचे सरकार प्रशासनाच्या या बाबीकडे काळजीपूर्वक लक्ष देईल आणि शक्य तिथे लाभार्थ्यांच्या सहभागावर भर देईल. योजनेच्या अंमलबजावणीतील गळतीविषयी वारंवार तक्रारी येणे हे गरीबांशी प्रतारणा करणे आहे आणि ही कृती सामाजिक न्यायास छेद देते हे लक्षात घेता आमचे सरकार या समस्येकडे काटेकोरपणे लक्ष देईल. सामाजिक न्यायाच्या

योजना राबविण्यासाठी व त्याच्या संनियंत्रणासाठी विशेष सामाजिक परिरक्षण कक्ष स्थापन करण्यात येतील. जिल्हयामध्ये हे कक्ष जिल्हाधिका-यांना तर मंत्रालयामध्ये मुख्य सचिवांना जबाबदार असतील. थेट संपर्क साधण्यासाठी या कक्षांना एक विशेष हेल्पलाईन देण्यात येईल. अशा कार्यक्रमामध्ये गैरव्यवहार करणा-या संस्थांविरुध्द आमचे सरकार फौजदारी कार्यवाही करेल, अशा संस्थांना काळया यादीत टाकण्यात येईल व भविष्यात त्यांना कोणत्याही योजनेचे फायदे मिळणार नाहीत.

**राजर्षी शाहू महाराज आरोग्य योजना.**

१५. विशेष आरोग्य सुविधेचा " प्रकल्प एकसंघ " मध्ये समावेश असेल. समाजातील दुर्बल घटकांसाठी आरोग्य सेवेत सुधारणा व्हावी यासाठी " राजर्षी शाहू महाराज आरोग्य योजना " प्रस्तावित करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांना माहित आहेच की, डोंगराळ, आदिवासी व ग्रामिण भागातील गरजू व दुर्बल घटकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने शासनाने सार्वजनिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांचे विस्तृत जाळे या भागात निर्माण केले आहे. मानवी विकास अहवालात नमूद केलेल्या आरोग्यदृष्या कमकुवत जिल्ह्यामध्ये निर्देशांकात कमी पडलेल्या जिल्ह्यात राजर्षि शाहू महाराज आरोग्य योजने अंतर्गत या संस्थांना उपकरणे, यंत्रसामुग्री व इतर साधनसामुग्री पुरविण्यात येईल. याशिवाय, प्रथम संदर्भ सेवा संस्थामध्ये सुरक्षित रक्तपुरवठा, आपत्कालीन प्रसुती तथा नवजात बालक सेवा या सुविधांमध्ये वाढ प्रस्तावित आहे. दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्याच्यादृष्टीने वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व निमवैद्यकीय कर्मचारी यांची क्षमता वाढविण्यात येईल. ग्रामीण महाराष्ट्रातील मागास भागात राहणाऱ्या दुर्बल घटकांतील लोकांना लाभ देण्यासाठी या योजनेकरीता रुपये २५ कोटी

एवढया अतिरिक्त रकमेची या अर्थसंकल्पात तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

दलित वस्ती व तांडा विकास.

१६. निवारा हा सामाजिक सुरक्षिततेतील एक महत्वाचा घटक आहे. शासनाने आता असे ठरविले आहे की, ग्रामिण दलित वस्ती योजनेअंतर्गत असलेली तरतूद पुढील दोन वर्षात पिण्याचे पाणी व स्वच्छता यासाठी प्राधम्याने वापरली जाईल. विमुक्त जाती आणि भटक्या जमातीसाठी दलित वस्ती सुधार योजनेच्या धर्तीवर तांडा योजना राबविण्यात येईल. झोपडपट्टयातील लोकसंख्येमध्ये मागासवर्गीय जनतेचा फार मोठा समावेश आहे. येत्या काही वर्षांमध्ये या जमातीच्या लोकांच्या विकासासाठी कालबध्द व एकसंध असा झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम आखण्यात येईल जेणेकरुन लोकांना निवाऱ्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. शहरी भागातील दलित वस्ती योजनेसाठी करण्यात आलेली तरतूद आता निश्चित करण्यात आलेल्या दलित वस्त्यांच्या सुधारणांसाठी वापरली जाईल. सध्या मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत २७,५१९ एवढी घरे बांधकामाच्या निरनिराळया टप्प्यांवर आहेत. ही घरे लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी विशेष यंत्रणा निश्चित करण्यात येईल. लोक आवास योजना व ग्रामिण निवारा योजनांमधील तरतूदी विमुक्त व भटक्या जमातीतील लाभार्थ्यांसाठी लागू केल्या जातील. वरील सर्व योजनांसाठी योग्य त्या वित्तिय तरतूदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण.

१७. आदिवासी उपयोजनेमार्फत राज्यातील आदिवासी जनतेवर विशेष लक्ष पुरविण्यात येते हे सन्माननीय सदस्यांना माहित आहेच. सध्या १९१ वसतीगृहे आणि ४१६ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून सन २००२-०३ मध्ये ५३ नवीन

शासकीय वसतीगृहे आणि १० नवीन आश्रमशाळा सुरु करण्यात येवून आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष दिले आहे. २८ वसतीगृहांचे इमारत बांधकाम पूर्ण झाले आहे तर २६ इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. सन २००३-०४ मध्ये ५ नवीन इमारतींचे बांधकाम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. ५६ आश्रमशाळा इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर असून ते सन २००३-०४ मध्ये पूर्ण होईल. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना मिळणारा निर्वाह भत्ता दि. १ एप्रिल, २००२ पासून दरमहा रु.३३५ वरुन दरमहा रु. ५०० पर्यंत वाढवण्यात आला आहे. त्याचा फायदा १,३८,८०० विद्यार्थ्यांना होईल. तसेच विभागीय, जिल्हा आणि तालुका पातळीच्या शासकीय वसतीगृहात राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा भत्ता अनुक्रमे रु. १५० वरुन रु. २००, रु. २५ वरुन रु. ७५ आणि रु. २५ वरुन रु. ५० वाढविण्यात आला आहे. याचा सुमारे १८,६८५ विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.

**आदिवासी विकासाची एकात्मिक योजना.**

१८. आदिवासींच्या कल्याणासाठी शासनाने वर नमूद केलेल्या विविध योजना हाती घेऊनही या क्षेत्रात विकासाच्या दृष्टिने अधिक ठोस कार्यवाही करण्याचा आमचा मानस आहे. नंदुरबार, धुळे, ठाणे, अमरावती, नाशिक, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, रायगड, पुणे, अहमदनगर व नागपूर या जिल्हयात या प्रत्येक जिल्हयातील १००० कुटुंबांसाठी एकात्मिक विकास प्रकल्प तयार करण्याचे प्रस्तावित आहे. या कार्यक्रमामध्ये अल्प भूधारक व सीमांतिक शेतकऱ्यांकरिता फलोत्पादन, सामाजिक वनीकरण, ज्यांच्याकडे पशुधन आहे अशा अल्प भूधारक शेतकऱ्यांकरिता पशु विकास केंद्रे, पशु चिकित्सालये, चारा विकास कार्यक्रम व शेत मजुरांसाठी इतर सहाय्यकारी योजनेकरिता

मदत देणे, सार्वजनिक आरोग्य आणि स्त्रियांचे सक्षमीकरण इत्यादी घटकांचा समावेश असेल. हा एकात्मिक प्रकल्प ५ वर्षांकरिता एकूण १२००० कुटुंबासाठी राहिल व याकरिता रुपये १४४ कोटी खर्च अपेक्षित आहे. बायफ ही संस्था वाडी कार्यक्रम ज्याप्रमाणे राबवित आहे त्याच धर्तीवर सदर कार्यक्रम नामांकित स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येईल. या प्रयोजनार्थ रुपये २० कोटी एवढा निधी राखून ठेवण्यात आलेला आहे.

**आदिवासी क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकास.**

**१९.१** दुर्गम आदिवासी भागात वन संवर्धन कायद्यातील तरतुदीमुळे विद्युतीकरण करण्यात येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन या भागाचे विद्युतीकरण करण्याच्या उद्देशाने पर्यायी ऊर्जा स्त्रोत म्हणून सौर ऊर्जा व पवन ऊर्जेद्वारे विद्युत निर्मिती करण्याकरिता तसेच कमी किंमतीचे जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी दरवर्षी रुपये १ कोटी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

**१९.२** अक्कलकुआ व धडगाव या तालुक्यांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता विशेष कृती कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून त्याकरिता रुपये १० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**१९.३** बृहन्मुंबईसारख्या महानगरात राहणारा आदिवासी हा सीमांतिक समुदाय आहे. मुंबई उपनगरामध्ये एकूण ७२ आदिवासी पाडे असून त्या आदिवासी पाड्यांमधील लोकांचे पोषण, आरोग्य, शिक्षण आणि रोजगारीचा दर्जा जाणून घेण्याच्या उद्देशाने व त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी आवश्यक ते कार्यक्रम आखण्यासाठी अशा पाड्यांचे सर्वेक्षण करण्याचे ठरविण्यात आले आहे. या प्रयोजनार्थ रुपये १० लाख एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**१९.४** आदिवासी मुलांकरिता असलेल्या निवासी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकरिता या शाळांमधील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याचे ठरविले असून या कार्यक्रमामध्ये शिक्षकांच्या शिक्षण पध्दतीत सुधारणा करणे, संवाद कौशल्य वाढविणे व विषयांचे ज्ञान अद्ययावत करणे या बाबींचा समावेश आहे. यासाठी बाहेरील तज्ञ शिक्षकांच्या सहाय्याद्वारे ४ प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात येणार असून त्याकरिता रुपये ५० लाख भांडवली खर्च व दरवर्षी रुपये ४० लाख आवर्ती खर्च अपेक्षित आहे. या प्रयोजनार्थ रुपये १ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**१९.५** आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक दर्जाचा अभ्यास करुन आदिवासींचे जीवनमान सुधारण्याकरिता शासनाद्वारे विविध विकास क्षेत्रात पुरविल्या जाणाऱ्या सेवांचे मूल्यमापन, मूलभूत सुविधा प्रशिक्षण व कार्यक्रम, आरोग्य विषयक कार्यक्रम यामध्ये सुधारणात्मक उपाययोजना सूचवणे जरुरीचे आहे. त्या दृष्टीने निवडक क्षेत्रांचे सर्वेक्षण करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेला सहाय्य करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रयोजनार्थ रुपये १ कोटी इतका नियतव्यय राखून ठेवला आहे.

**१९.६** विदर्भातील आदिवासींच्या समृध्द संस्कृतीचे जतन करण्यासाठी नागपूर येथे गोंडवाना संग्रहालय व संशोधन केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रयोजनार्थ रुपये २५ लाख एवढा खर्च करण्यात येईल.

**१९.७** आदिवासींच्या जमिनीच्या पुन:स्थापनेबाबतच्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रक व मार्गदर्शनाकरिता त्याचप्रमाणे आदिवासींना विधी विषयक सहाय्य

देण्यासाठी प्रादेशिक पातळीवर विधी सल्लागार केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या कामासाठी रुपये २५ लाख इतका निधी राखून ठेवला आहे.

**२०.** रोजगार व स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे यास शासनाने प्राधान्य दिले आहे. यामुळे प्रत्येक व्यक्तीचा आत्मविश्वास तर वाढतोच शिवाय अशा लाभार्थ्यांमुळे लोकशाही बळकट व्हायला मदत होते. तरुण व निराधार महिला या दोन महत्वाच्या घटकांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी पाठबळाची गरज आहे.

मागेल त्याला प्रशिक्षण

**२१.** दारिद्रय रेषेखालील मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील कुटुंबातील तरुणांसाठी शासन व्यवसाय प्रशिक्षण हमी योजना (मागेल त्याला प्रशिक्षण) राबविणार आहे. तंत्रशिक्षण विभागाची लोकसेवा केंद्रे, शासन व कृषी विद्यापीठांकडून चालविल्या जाणाऱ्या कृषी लोकसेवा केंद्रे यामधून सदरहू प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अशा युवकांना एक संच देण्यात येईल, अशा प्रशिक्षणामुळे ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील. या योजनेंतर्गत पुढील वर्षामध्ये १ लक्ष युवकांचा समावेश केला जाईल, या प्रयोजनार्थ सरासरी प्रत्येकी रु. २५०० या दराने रुपये २५ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

महामंडळाद्वारे स्वयंरोजगार योजना.

**२२.** मागासवर्गीय दुर्बल घटकांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी निरनिराळी महामंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत, त्या महामंडळांचा कारभार सक्षम होण्याच्या दृष्टीने त्यांची पुर्नरचना करण्यात येईल. विविध केंद्रीय वित्तीय महामंडळाकडून प्रत्यक्ष कर्ज मिळणे सुलभ व्हावे यासाठी शासन आवश्यक ती पाऊले उचलत आहे. सध्या रु. २५ हजारापेक्षा

कमी रकमेचे कर्ज हे केंद्र शासनाच्या महामंडळाच्या कक्षेत येत नसल्याने, रु. २५ हजारापर्यंतचे कर्ज २ टक्के या व्याजदराने राज्य महामंडळाकडून दिले जाईल. मात्र यावर अनुदान दिले जाणार नाही. या योजनेअंतर्गत ५० हजार व्यक्तींचा समावेश करण्याचे उद्दीष्ठ आहे. कर्ज मंजूरीतील विलंब व अडवणूक टाळण्यासाठी कर्ज मंजूरीची प्रक्रिया सोपी केली जाईल. महिलांना रु. ५ हजारापर्यंतचे कर्ज मंजूर करण्यासाठी सुलभ कार्यपध्दती विहीत करण्यात येईल. सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळांसाठी सन २००३-०४ साठी रु. ४३.७५ कोटी एवढा अतिरिक्त नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. शासनाची अशी अपेक्षा आहे की, दुर्बल घटकांतील प्रत्येक बेरोजगार युवकाला या महामंडळांनी मदत करावी. या महामंडळांकडे पुरेसा निधी उपलब्ध असला व वितरीत केलेल्या कर्जाची संपूर्ण वसूली झाली तरच हे शक्य आहे. या महामंडळांनी पूर्वी वितरित केलेल्या कर्जाची वसुली केल्यास त्यांना शासनातर्फे निधीची कमतरता जाणवणार नाही. कर्ज वसूलीसाठी सुयोग्य वातावरण निर्माण करण्यासाठी सन्माननीय सदस्य शासनाला सर्वातोपरी मदत करतील याची मला खात्री आहे.

**अपंगांचे सक्षमीकरण**

२३. माझ्या शासनाने पुढील तीन वर्षासाठी व्यापक अशी विकलांग सहाय्य योजना राबविण्याचे ठरविले आहे. जिल्हे, पंचायत समित्या व नगरपरिषदांमधील निरनिराळया विकलांग घटकांना मिशन मोड तत्वावर सहाय्य केले जाईल. सर्व शाळांमध्ये विकलांग विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, सार्वजनिक ठिकाणी सुलभतेने वावरण्याची सोय, शस्त्रक्रियेसाठी शक्य तेथे सहाय्य, उपयंत्राची मदत, सामाजिक व आर्थिक पुनर्वसन या बाबींचा यात समावेश आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता

अभियान या योजनेच्या धर्तीवर सर्वांचा समावेश होईल अशी वार्षिक रु. ५ लक्ष खर्चाची ही योजना असेल. पुनर्वसनाचे काम हे नागरी समाजाच्या मदतीने करण्यात येईल. निरनिराळ्या मार्गाने उपलब्ध होणारा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येणाऱ्या एजन्सीकडे वर्ग करण्यात येईल. शासन व इतर दाते यांचेकडून प्राप्त होणाऱ्या रकमेचा शासन स्तरावर एक निधी उभारण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या निरनिराळया योजनांसाठी मी या अर्थसंकल्पात रुपये ५ कोटी एवढया रकमेची तरतूद प्रस्तावित केली आहे.

महिलांचे संरक्षण.

२४. विशेषत: दुर्बल घटकातील महिला या प्रत्येक ठिकाणी दुर्लक्षित, शोषित घटक आहे. वास्तवत: त्यांचे विकास योजनेतील स्थान नगण्य असते. असा विकास अर्थपूर्ण किंवा चिरस्थायी ठरत नाही. अडचणीत असणाऱ्या महिला किंवा निराधार महिला या लैंगिक व आर्थिक शोषणास सहजपणे बळी पडणारा घटक आहे. शासन या प्रश्नाला अतिशय महत्व देत असून त्याला गंभीरपणे तोंड देण्यासाठी सज्ज आहे. सर्व महिला व बाल विकास योजनांचे पुर्नविलोकन करण्यात आले आहे. त्यानुसार कालबाहय योजना बंद करण्यात येवून उर्वरित योजना एकात्मिकदृष्टया राबविण्यात येतील. महिला घटक योजनेसाठी आगामी वर्षात रु. ३५ कोटी इतकी अतिरिक्त तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना.

२५. इंदिरा गांधी महिला संरक्षण योजनेमध्ये, निराधार महिला, अडचणीत असलेल्या महिला जसे, विधवा, परितक्त्या, निराश्रीत मुली, कैद्यांच्या पत्नी, देवदासी, लैंगिक शोषण व अत्याचारपिडीत महिला, एड्स रुग्णाच्या पत्नी यांचा समावेश आहे. अशा महिलांना शोधून त्यांची नोंद करुन त्यांना विशेष

ओळखपत्र देण्यात येईल. अशा महिलांचे प्राथम्याने पुर्नवसन करण्यासाठी विशेष आर्थिक योजना अनुदान व सुलभ कर्ज माध्यमातून करण्यात येईल. त्यांचे पुर्नवसन होईपर्यंत त्यांना रु. २५० प्रतिव्यक्ती दरमहा सहाय्य देण्यात येईल. या योजनेचा फायदा जवळपास १ लाख महिलांना मिळेल. अशा महिलांना पुर्नवसनाची दिलेली हमी शासन प्रभाविपणे अंमलबजावणी करेल. अशा महिलांच्या मुलांना मागासवर्गीय मुलांच्या प्रमाणेच शिक्षणाच्या सवलती देण्यात येतील. स्वयंसहाय्य गटाच्या माध्यमातून त्यांचे सक्षमीकरण करण्यात येईल. स्वसंरक्षण हे सक्षमीकरणामध्ये अंतर्भुत असेल. महिला आर्थिक विकास महामंडळ हे महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाचे नोडल एजन्सी म्हणून काम पाहिल.

सामाजिक न्यायासाठी आघाडी.

२६. अनिवासी भारतीय, उद्योगसमुह व इतर यांचेशी माझ्याबरोबर झालेल्या चर्चेवरुन असे दिसून आले आहे की, विविध सामाजिक प्रश्नाबाबत त्यांना जाणिव असून दुर्बल घटकांना मदत करण्याची त्यांची इच्छा आहे. या जाणिवेचा फायदा दुर्बल घटकांना करुन देण्यासाठी नागरी समाजाच्या मदतीने सामाजिक न्यायासाठी आघाडी सुरु करण्यात येईल. यादृष्टीने राज्य शासन सामाजिक न्याय निधी उभा करु इच्छिते. हा निधी राज्य शासन उद्योग समूह, सन्माननिय व्यक्ती व जनता यांच्या सहभागातून उभा करेल. या निधीद्वारे महिलांचे, अपंगांचे, वृध्दांचे व मुलांचे पुनर्वसन व सक्षमीकरण करण्यात येईल. यामुळे समाजातील विषमता कमी होण्यास मदत होईल. या प्रयोजनार्थ राज्य शासनाचा हिस्सा म्हणून रुपये ५ कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. हा निधी निरनिराळया कल्याणकारी योजनांसाठी समरुप सहभागावर वापरण्यात येईल.

लोकसेवा केंद्रे

२७. बेरोजगारांना रोजगाराच्या संध्या उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून त्याचप्रमाणे नागरीकांना स्थानिक संस्थाच्या मदतीने सोयीसुविधा पुरविण्यासाठी राज्यामध्ये शहरी व ग्रामिण भागात ५९६ लोकसेवा केंद्रे स्थापण्यात आली आहेत. सर्व सेवा योजन कार्यालयाचे संगणकीकरण करण्यात आले आहे तसेच वर्धनक्षम व्यवसाय निवडणे सुलभ व्हावे यासाठी गावनिहाय पाहणी करण्यात आली आहे.

अल्पसंख्यांक व आर्थिकदृष्टया दुर्बल घटक.

२८. अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या तरुणांना स्वयंरोजगार सुरु करण्यास उत्तेजन देण्यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाने अशा १००१ लाभार्थ्यांना रुपये ७.४८ कोटींचे कर्ज वितरीत केले आहे. त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामधील ४३ बरोजगार तरुणांना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने रुपये २४ लाख कर्ज वितरीत केले आहे. या महामंडळाच्या कार्यपध्दतीत सुधारणा करणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे यासाठी सन २००३-०४ या वर्षाकरीता त्यांना शासनाचे भागभांडवल म्हणून प्रत्येकी रुपये १० कोटी इतकी रक्कम देण्यात येईल. सन २००२-०३ मध्ये ही रक्कम अनुक्रमे रुपये १.५० कोटी व रुपये ६ कोटी इतकी होती.

इतर मागासवर्गासाठी फी माफी व शिष्यवृत्ती.

२९. इतर मागासवर्ग हा राज्यातील जनसंख्येचा सर्वात मोठा घटक असून आपल्या अर्थव्येवस्थेच्या पाठीचा कणा आहे. या समाजातील तरुण व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता आहे, असे शासनाला वाटते. यासाठी शालांत परीक्षेनंतर शिष्यवृत्ती इतर

मागसवर्गीय विद्यार्थ्यांना सुध्दा लागू करण्यात येईल. यामुळे सुमारे ४ लाख विद्यार्थ्यांचा फायदा होणार असून यासाठी शासनाला दरवर्षी रुपये १२० कोटी एवढा खर्च येईल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या फी माफी योजनेचा फायदा सुध्दा क्रीमी लेअर वगळून इतर मागासवर्गातील क्रीमीलियरच्या आत सुमारे ४ लाख विद्यार्थ्यांना देण्यात येईल. यामुळे शासनाला दरवर्षी ५८ कोटी रुपये खर्च येणार आहे. या दोन योजनांमुळे शासनाला वार्षिक रु. १७८ कोटी खर्च करावे लागणार आहेत. यासाठी रु. १२५ कोटी रकमेची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. उर्वरित निधीची तरतूद वर्षभरात केली जाईल. इतर मागासवर्गातील तरुणांमध्ये स्वयंरोजगाराची क्षमता विकसित करण्यासाठी इतर मागासवर्ग विकास महामंडळाला अतिरिक्त भागभांडवलाचे सहाय्य शासन देणार आहे.

शासनास पूर्ण जाणीव आहे की, या राज्यात आर्थिकदृष्टा मागासलेला फार मोठा वर्ग आहे. या संवर्गात शासनाच्या काही योजनांचा लाभ मिळत असला तरी या संवर्गाच्या एकूण परिस्थितीचा विचार करता त्यांच्यासाठी इतर वर्गाप्रमाणे सर्वसमावेक असा कार्यक्रम आखण्यात आलेला नाही, याचे मुख्य कारण म्हणजे या संवर्गाच्या विकासाची जबाबदारी कोणत्याही विभागाकडे सोपवलेले नव्हती. ही वस्तुस्थिती लक्षात घेता आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या संवर्गाच्या विकास कार्यक्रमाच्या समन्वयाची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाकडे देण्याचे शासनाने निश्चित केले आहे. सामाजिक न्याय विभागातर्फे या संवर्गासाठी लवकरच विकासात्मक कार्यक्रम घोषित करण्यात येईल.

कृषीसप्तक कार्यक्रम.

**३०.१** राज्याच्या शेती विकासाची पुढील २५ वर्षांची दिशा निश्चित करण्यासाठी सर्वंकष आराखडा तयार करण्याकरिता आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शेतीतज्ञ डॉ.एम.एस.स्वामीनाथन् यांचे अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली होती. या समितीने दिनांक ३१ डिसेंबर २००२ रोजी सादर केलेला अहवाल शासनाने तत्वत: स्विकृत केला आहे. या अहवालात ३४७ शिफारशी करण्यात आल्या असून त्यातील खालील सात प्रमुख शिफारशींची अंमलबजावणी कृषी सप्तक या कार्यक्रमांतर्गत सन २००३-०४ पासून करण्याचे प्रस्तावित आहे.

(१) पीक विमा योजना सर्व कोरडवाहू शेतकऱ्यासाठी टप्प्याटप्प्याने वाढविणे.

(२) कोरडवाहू शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होण्याकरिता सेंद्रीय शेती, एकात्मिक कीड व्यवस्थापन, गांडूळ खताचा वापर, जैविक खते व जैविक औषधांचे उत्पादन, इत्यादि योजना मोठ्या प्रमाणात राबविणे तसेच सर्व शेतक-यांना मृद परिक्षण पत्रिका देणे.

(३) शेतकऱ्यांना कृषी व बाजार विषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यास महाराष्ट्र कृषी व फलोत्पादन माहिती व तंत्रज्ञ अभियान (माहिती) हाती घेणे आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी व्हर्च्युअल विद्यापिठाची स्थापना करणे.

(४) कृषि मालाच्या गुणवत्ता चाचणीकरिता विविध प्रयोगशाळांची निर्मिती करणे व पणन माहिती केंद्रांचे जाळे उभारणे.

(५) कृषि क्षेत्रात महिलांचा अधिक कार्यक्षम सहभाग वाढविणे.

(६) शेती व संलग्न क्षेत्रात स्वयंरोजगार निर्मितीस मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देणे.

(७) कृषि मंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील कृषि व संलग्न विषयांशी निगडित प्रगतीशील शेतकरी, तज्ञ, शास्त्रज्ञ इत्यादिंचा समावेश असणारी कृषि परिषद स्थापन करणे.

**३०.२** सन २००३-०४ या वर्षापासून वरील काही शिफारशींची अंमलबजावणी सध्या सुरु असलेल्या योजनांतर्गत योजनेतून करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. तसेच काही नवीन शिफारशींच्या अंमलबजावणीकरिता रुपये २० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

सर्व शिक्षण मोहिम.

**३१.** सर्व शिक्षण मोहिमेची अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वी शासनाने शाळाबाह्य मुलांसाठी वस्तीशाळा आणि महात्मा फुले शिक्षण हमी योजना कार्यान्वित केल्या आहेत. या योजनांतर्गत मोठ्या प्रमाणावर शाळाबाह्य मुलांची पट नोंदणी करण्यात आली आहे. आता या योजना सर्व शिक्षण मोहिमेचाच भाग झाल्या आहेत.

६ ते १४ वयोगटातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी शासन सर्व शिक्षण मोहिमेची यशस्वीपणे अंमलबजावणी करीत आहे. या योजनेकरिता सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ४७.५९ कोटी इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित केली आहे.

मोफत पाठ्यपुस्तके.

**३२.** चालू वर्षी या योजनेखाली राज्यातील सर्व जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिका शाळांत तसेच अनुदानित शाळांत शिकणाऱ्या सर्व मुलींना १ ली ते ८ वी पर्यंतची पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्यात येतील. तसेच या शाळांमध्ये

शिकणाऱ्या अनुसूचित जाती व जमातीच्या मुलांना देखील १ ली ते ८ वी पर्यंतची पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्यात येतील. वस्तीशाळा तसेच महात्मा फुले शिक्षण हमी केंद्रात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देता येईल. या बाबींवरील खर्च अंदाजे रुपये २६ कोटी इतका असेल व तो सर्व शिक्षण मोहिमेतील तरतूदीतून भागविण्यात येईल.

वेतन अनुदानाच्या चार जिल्हास्तरीय योजनांचे राज्यस्तरीय योजनांमध्ये रुपांतर.

**३३.** शिक्षकांना नियमित वेतन मिळावे आणि शिक्षणाचा समतोल विकास व्हावा या दृष्टीने सन २००२-०३ या वर्षापासून वेतन अनुदानाच्या चार जिल्हास्तरीय योजनांचे राज्यस्तरीय योजनांमध्ये रुपांतर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरविणे.

**३४.** राज्य शासनाने शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरविण्यास सुरुवात केली आहे व याकरिता सन २००२-०३ या आर्थिक वर्षात रुपये ३१.६० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. सन २००३-०४ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १०९.२४ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

जल प्रदूषण निवारण योजना.

**३५.** पर्यावरण विभागाने केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत जल प्रदूषण निवारण योजना हाती घेतली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश नागरी सांडपाण्यामुळे होणारे नदीच्या पाण्याचे प्रदूषण कमी करणे असा आहे. या योजनेंतर्गत गोदावरी नदीवरील त्र्यंबकेश्वर, नाशिक आणि नांदेड शहरे व कृष्णा नदीवरील कराड व सांगली शहरे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत रुपये ९२.८६ कोटी एवढ्या

किमतीच्या कामांना मान्यता मिळाली आहे. आतापर्यन्त रुपये ५५ कोटींची सांडपाणी अडविणे- वळविणे, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, कमी किंमतीची स्वच्छतागृहे, सुधारित स्मशानगृहे व नदीघाटचा विकास ही कामे हाती घेण्यात आली आहेत. या योजनेकरिता सन २००३-०४ साठी रुपये २० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

स्वयंरोजगारासाठी वर्धनक्षम व्यवसायांचे सर्वेक्षण.

**३६.** लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी वर्धनक्षम उद्योग व व्यवसायांची निवड करणे सुलभ व्हावे या उद्देशाने संपूर्ण राज्यात उद्योग व व्यवसायांचे गावनिहाय सर्वेक्षण करण्यात आले आहे व त्यानुसार जिल्हा रोजगार आराखडे तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील तरुणांना लहानलहान उद्योग निवडणे सुलभ होईल. तसेच बँकांना देखील स्वयंरोजगाराची कर्ज प्रकरणे मंजूर करणे सुलभ होईल असा मला विश्वास आहे.

दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका धारकांना सवलत.

**३७.** राज्यातील गोरगरीब जनतेला दिलासा देण्याच्या उद्देशाने दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका धारकांना सवलतीच्या दराने तांदूळ उपलब्ध करुन देण्यासाठी सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ५९.१९ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याशिवाय अंत्योदय अन्न योजनेंतर्गत धान्य वितरणावरील खर्चासाठी सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ३८.५२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे. अन्नपूर्णा योजनेवरील वाहतूक व वितरण खर्च भागविण्यासाठी सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ४३.९२ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

मी असेहि नमूद करु इच्छितो की, राज्यातील बंद पडलेल्या कापड गिरण्या, सूत गिरण्या, साखर कारखाने व एक हजारापेक्षा

जास्त कामगार असलेले खाजगी उद्योगधंदे यातील ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १५ हजारापेक्षा कमी आहे अशा कामगारांना सध्या दारिद्र्य रेषेखालील दराने धान्य पुरवठा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

किमान आधारभूत किंमतीने धान्य खरेदी कार्यक्रम.

**३८.** राज्यातील शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचा लाभ देण्यासाठी चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यभरात सुमारे ७५० खरेदी केंद्रे उघडून, प्रति क्विंटल रुपये ४८५ या दराने ज्वारी, बाजरी व मका व प्रति क्विंटल रुपये ५३० किंवा रुपये ५६० या दराने भाताची खरेदी करण्यात आली आहे. शिवाय प्रति क्विंटल रुपये ५ ते रुपये २० या दराने विशेष दुष्काळी मदतही अदा केली आहे. दिनांक २५ जानेवारी २००३ पर्यंत सुमारे १३ लक्ष क्विंटल भात, ५ लक्ष क्विंटल ज्वारी व १३ हजार क्विंटल मक्याची खरेदी करण्यात आली आहे. गतवर्षी या योजनेत गुंतलेला रुपये १२५ कोटींचा निधी केंद्राकडून पूर्णतः मिळाला नसला तरी, शासनाने चालू वर्षी स्वतःच्या निधीतून दिनांक ३१ जानेवारी २००३ पर्यंत सुमारे रुपये ११० कोटी इतका खर्च करुन, शेतकऱ्यांचे सर्व पैसे अदा केले आहेत.

माहिती व तंत्रज्ञान.

**३९.१** राज्यातील नागरिकांना इ- गव्हर्नन्सचे लाभ मिळवून देण्याकरिता राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊले गेल्या तीन वर्षात उचलली आहेत. असे केल्यामुळे नागरिकांना लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे शक्य झाले आहे. शासनाने केलेली ही कामगिरी लक्षात घेऊन संगणक क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या सेतू- नागरिक सुविधा केंद्र, सर्वोत्तम वेबसाईट- सार्वजनिक बांधकाम विभाग व सरिता-नोंदणी व मुद्रांक शुल्क कार्यालयाची आज्ञावली या उपक्रमांना सन २००२

ची ई-गव्हर्नन्स पारितोषिके २००२ प्रदान केलेली आहेत ही अभिमानास्पद बाब आहे.

**३९.२** संगणकीकरणाच्या शासनाच्या धोरणाच्या परिणामी ग्रामीण जनतेस ७/१२ चा उतारा, शहरी भागात प्रॉपर्टी रेकॉर्ड कार्ड सहजरीत्या उपलब्ध होणे, मंत्रालयीन कर्मचा-यांसाठी संगणकीकृत उपस्थिती नोंदणी प्रणाली, जनतेने शासनाकडे सादर केलेल्या पत्रव्यवहाराची व गा-हाण्यांची माहिती सहज आज्ञावलीद्वारे उपलब्ध होणे ही उद्दिष्टे सफल झालेली आहेत.

**३९.३** नागरिकांना केव्हाही, कोठेही, कधीही नागरी सुविधा प्राप्त करुन देण्यासाठी राज्यात आय-सेतूचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**व्ही-सॅट यंत्रणा.**

**४०.** आपत्कालीन व्यवस्थेचा एक भाग म्हणून राज्यव्यापी व्ही-सॅट यंत्रणा उभारलेली असून, सदर व्ही-सॅट यंत्रणा राज्यातील जवळ जवळ सर्व जिल्ह्यांत उपलब्ध आहे. या यंत्रणेद्वारे व्ही-सॅट फोन, व्हिडियो कॉन्फरसिंग व ई-मेल या सेवा उपलब्ध आहेत. या व्ही-सॅट महानेट यंत्रणेचे अद्ययावतीकरण करुन त्याची क्षमता वाढविण्यात येत आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून मुंबई व पुणे येथील नियंत्रण कक्षांमधून राज्यातील कुठल्याही जिल्ह्यातील अधिका-यांशी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे आवश्यक त्या सूचना तात्काळ देता येणे शक्य झाले आहे. परिणामी प्रशासकीय खर्चांमध्ये बचत होण्यास मदत झाली आहे.

**क्रांतीसिंह नाना पाटील यांचे स्मारक.**

**४१.** भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रती सरकारचे निर्माते क्रांतीसिंह नाना पाटील यांचे यथोचित स्मारक सांगली जिल्हयातील येडेमच्छिंद्र व कुंडल येथे उभारण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्यासाठी सन २००३-०४ या वर्षाकरिता सुरुवातीस

रुपये २० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक तो संपूर्ण निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

कवीवर्य बा. सी. मर्ढेकर यांचे स्मारक.

४२. मराठीतील नामवंत कवी बा. सी. मर्ढेकर यांचे स्मारक सातारा जिल्हयातील मर्ढे येथे उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ३० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे.

४३. महाराष्ट्राच्या रयतेसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यतीत केलेल्या गौरवशाली जीवनाचे स्मारक चिरंतन रहावे यासाठी रायगड येथे मेघडंबरीत छत्रपतींचा पुतळा उभारण्याचे प्रस्तावित आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये १० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर मालिका.

४४. मुंबईतील ॲड-डिक्ट या संस्थेने तयार केलेली दूरदर्शन मालिका छत्रपती शिवाजी दूरदर्शन-१ वरुन प्रक्षेपित होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा संदेश देशभर पोहोचविण्याचा दृष्टीकोन समोर ठेवून राज्य सरकारने सदर मालिकेस रुपये ५० लक्ष इतकी आर्थिक मदत शासकीय जाहिरातींच्या रुपाने देण्याचा निर्णय घेतला आहे.

नागपूर येथील आंतरराष्ट्रीय बहुविध विमानतळ.

४५. शासनाने विदर्भाच्या विकासाला गती देण्याच्या दृष्टीने नागपूर येथील आंतरराष्ट्रीय बहुविध विमानतळ विकसित करण्याबाबत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या प्रयोजनार्थ सन २००२-०३ मध्ये भूसंपादनाकरिता रुपये ४० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर प्रकल्प जलद गतीने पूर्ण होण्याकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी या नावाची एक विशेष उद्देशीय कंपनीची स्थापना करण्यात आली आहे.

राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण.

**४६.** सन २०००-०१ पासून पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची योजना राबविण्यात येत आहे. साधनसामुग्री, दळणवळण, प्रशिक्षण, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, शस्त्रे, पोलीस हाऊसिंग, इमारत, संगणकीकरण इत्यादींच्या आधुनिकीकरण व उन्नतीचा समावेश सदर योजनेत आहे. या योजनेवर आतापर्यंत रुपये २४३.६७ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे. पोलीस दलाकरिता सुमारे २,००० नवीन वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. व्ही-सॅट दळणवळण यंत्रणेचे उन्नतीकरण करण्यात आलेले आहे. मुंबई येथे हाताच्या ठशांची ओळख पटविणारी ऑटोमॅटीक कॉम्प्युटराईज्ड फिंगरप्रिंट आयडेंटीफिकेशन सिस्टीम ही यंत्रणा बसविण्यात आलेली असून गुन्हेगारांच्या हातांच्या ठशांची नोंदणी ठेवण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त बुलेट प्रुफ कार्स, वॉकीटॉकी सेट्स, स्पीड बोट्स व नक्षलग्रस्त भागांकरिता स्वयंचलित रायफल्स पुरविण्यात आल्या आहेत. सन २००२-०३ मध्ये आतापर्यंत एकुण रुपये २६८.३६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून, सन २००३-०४ करिता रुपये १८४.२० कोटी इतक्या निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

पोलीस दलाकरता निवासस्थाने.

**४७.** राज्यातील पोलीस अंमलदारांचे कर्तव्याचे विशिष्ट स्वरुप लक्षात घेऊन तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून राज्यातील राज्य राखीव पोलीस बल, बृहन्मुंबई पोलीस बल व मुंबई बाहेरील पोलीसांना जवळपासच्या परिसरात निवासे पुरविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन राज्य शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

(१) पोलीस, पोलीस गृहनिर्माण महामंडळ, तुरुंग व होमगार्ड यांच्या ताब्यातील सर्व भूखंडांवर निवासी गाळे बांधण्याच्या प्रकल्पासाठी चटई निर्देशांक २.५ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(२) वाणिज्यिक वापरासाठी चटई निर्देशांकाची सध्याची मर्यादा ४० टक्के पर्यन्त मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद व नागपूर यासाठी वाढविण्यात आली असून इतर ठिकाणी ही मर्यादा २५ टक्क्यापर्यन्त राहील.

(३) आरक्षित जमिनीच्या खाजगी मालकांना हस्तांतरणीय विकास हक्क अनुज्ञेय करण्यात आला आहे. वेगवेगळया शासकीय भूखंडांचे एकत्रिकरण करुन सदर नियम लागू करण्याची मुभा देण्यात आली आहे.

यामुळे पोलीस विभाग, तुरंग विभाग तथा होमगार्डच्या ताब्यातील व त्यांच्याकरिता आरक्षित जमिनीवर विनाशुल्क निवासस्थाने बांधून मिळतील.

नागरी संरक्षण व होमगार्ड संघटनांचे बळकटीकरण.

**४८.** नागरी संरक्षण व होमगार्ड संघटनांचे बळकटीकरण करण्याकरिता विविध प्रकारची साधनसामग्री, वाहने, प्रशिक्षण साहित्य इत्यादीच्या खरेदीसाठी तसेच धोक्याचा इशारा देणा-या इशारा प्रणालीचे नविनीकरण आणि दोन्ही संघटनेच्या स्वयंसेवकांच्या भत्त्यात वाढ या बाबत नुकताच शासनाने निर्णय घेतला आहे. या संघटनांसाठी सन २००३-०४ करिता रुपये २९.२६ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

पर्यटन विकास.

**४९.१** पर्यटन उद्योगामध्ये रोजगार निर्मितीला भरपूर वाव असून या क्षेत्रामध्ये रुपये १० लक्ष गुंतविल्यास ८९ रोजगार निर्माण होतात. उलटपक्षी एवढीच गुंतवणूक उत्पादन व कृषि क्षेत्रात केल्यास अनुक्रमे अंदाजे सरासरी १३ व ४५ रोजगार निर्माण होतात. याशिवाय पर्यटन उद्योगामुळे ग्रामीण क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विकासही होऊ शकतो. पर्यटनाच्या दृष्टीने महाराष्ट्र हा वरदान लाभलेला प्रदेश असून राज्यात ७२० किलोमीटर समुद्रतट, पुरातन वास्तु, तिर्थक्षेत्रे, महानगरे, किल्ले व गिरिस्थाने अशी विविध पर्यटन आकर्षणे आहेत. तसेच

महाराष्ट्र हा वैविध्यपूर्ण संस्कृतीचा व आतिथ्यशील लोकांचा प्रदेश आहे. राज्यांच्या विकासासाठी पर्यटन क्षेत्राची क्षमता लक्षात घेता राज्य शासनाने या क्षेत्राला विशेष चालना देण्याचे ठरविले आहे. या क्षेत्रासाठी सन २००३-०४ करिता रुपये १०१ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला असून त्यात मागील वर्षांच्या तुलनेत भरीव वाढ करण्यात आली आहे.

**४९.२** अजंठा-वेरुळ संवर्धन विकास प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. या प्रकल्पाला सर्वोत्कृष्ट वारसा प्रकल्पाचे आंतरराष्ट्रीय पॅसिफीक एशिया ट्रॅव्हल असोसिएशन ग्रँड अवार्ड मिळाला आहे. केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने याच प्रवर्गात या प्रकल्पाला राष्ट्रीय पुरस्कार देखील प्रदान केला आहे. जपान शासनाने या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी रुपये ३६० कोटी इतका निधी मंजूर केला असून त्यात रस्ते विकास, विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा, वनीकरण व लेण्यांचे संवर्धन या बाबींचा समावेश आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ साठी रुपये ५५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**४९.३** मुंबई-रायगड, किल्ला जंजिरा, किल्ला कुडा, लेणी श्रीवर्धन, हरिहरेश्वर व सिंधुदुर्ग असा राष्ट्रीय पर्यटन सर्कीट कोकण रिव्हिएरा म्हणून जाहीर केला आहे. या पर्यटन सर्कीटचा विकास हाती घेण्यात येत आहे. सन २००३-०४ साठी रुपये ५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**४९.४** राज्यातील हजारो तीर्थयात्रेकरुंच्या सोईसाठी अष्टविनायक व ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्रांच्या विकासाच्या योजना हाती घेण्यात येत आहेत. सन २००३-०४ साठी रुपये १२ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**४९.५** महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाला पर्यटकांसमोर आणण्यासाठी किल्ले मंडल विकसित करण्यात येणार असून, प्रथमतः श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ शिवनेरी किल्ल्याकडे विशेष लक्ष देण्यात येईल व या किल्ल्याचे सुशोभिकरण, पाणी व्यवस्था व पोचरस्ते अशी विकासाची कामे हाती घेण्यात येतील. सन २००३-०४ साठी या प्रयोजनार्थ रुपये १० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**४९.६** विदर्भातील बरेच मोठे क्षेत्र वनाच्छादित असुन हा विभाग वन्यजीवन व वन पर्यटन विकासासाठी अतिशय योग्य आहे. खाजगीक्षेत्राच्या सहभागाने हे क्षेत्र वन्यजीवनसंपत्ती पर्यटनक्षेत्र म्हणून विकसीत करण्याचा मानस आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ वन्यजीवन अभयारण्याच्या बाहेरची जमीन अधिग्रहित करुन या जमिनीचा वापर विकासाकरिता करील. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ करिता रुपये ५ कोटी एवढी तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेमुळे विदर्भातील आदिवासी प्राबल्य असलेल्या वन्यक्षेत्रात रोजगार निर्मिती होण्यास हातभार लागेल.

बुलढाणा जिल्हयातील उल्काघाती विवर याचे संवर्धनाचे काम हाती घेण्यात येत असून यामुळे संवेदनशील व एकमेवाद्वितीय पर्यावरणाचे जतन करण्यात येईल व याचा जागतिक पर्यटन केंद्र म्हणून विकास करण्यात येईल.

**४९.७** प्रसिध्दी व प्रचालन हे जगभर पर्यटन विकासाचा अविभाज्य भाग राहिला आहे. आज प्रमुख पर्यटन केंद्रे भारतात येऊन आक्रमकरीत्या आपल्या केंद्रांचा प्रचार व प्रचालन करीत आहेत. प्रचालनाचे पर्यटन विकासातील महत्व लक्षात घेऊन राज्याच्या पर्यटन केंद्रांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी मोहिम

आखण्यात आली आहे. यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांना आकर्षित करणे शक्य होईल. सन २००३-०४ साठी रुपये ७.९५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

समुद्र धुप प्रतिबंधक बंधारे.

५०. राज्याच्या किनारपट्टीवरील धूपप्रवण भागात दर वर्षी विशेषत: पावसाळयामध्ये जमिनीची धूप झाल्यामुळे वित्त हानी होते. त्यास प्रतिबंध घालण्यासाठी सन २००३-०४ या वित्तीय वर्षात समुद्र धूपप्रतिबंधक बंधारे या योजनेंतर्गत रुपये ७.५७ कोटी आणि कोकण विकास कालबध्द कार्यक्रमांतर्गत रुपये २.९७ कोटी अशी एकुण रुपये १०.५४ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

जेट्टींची विशेष दुरुस्ती.

५१. मुंबई शहराला जलवाहतूक मार्गाने जोडणा-या रायगड जिल्हयातील मांडवा, रेवस व मोरा या प्रवासी बंदरांतून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. या तिन्ही बंदरातील अस्तित्वात असलेल्या धक्के फार वर्षापूर्वी बांधलेल्या असल्यामुळे व प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर जेट्टींची विशेष दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे या कामासाठी सन २००३-०४ मध्ये रुपये ३ कोटींची तरतूद बंदरे व दीपगृहे या प्रयोजनार्थ उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे

उच्च व तंत्र शिक्षण.

५२. १०० वर्षापेक्षा अधिक काळ अभियांत्रिकी शिक्षण देणा-या मुंबईतील वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूट या अग्रगण्य संस्थेत मुलींच्या वसतीगृहाकरिता रुपये १ कोटी इतकी तरतूद सन २००३-०४ करिता प्रस्तावित केली आहे. यामुळे राज्यातील विद्यार्थिनींना या नामवंत शिक्षण संस्थेत अभियांत्रिकी शिक्षण घेऊन पुढे येण्याची सुवर्ण संधी उपलब्ध होईल.

वाल्मीकी आंबेडकर आवास योजना.

५३. राज्याच्या ६२ शहरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या दुर्बल घटकातील तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांसाठी वाल्मीकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत पात्र झोपडपट्टीवासियांना नवीन घरे बांधण्यासाठी प्रत्येकी रुपये ६०,००० पर्यंत अनुदान देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेसाठी सन २००३-०४ या वर्षामध्ये रुपये १०.२१ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित केली आहे.

राज्यस्तर लघु पाटबंधारे.

५४. लघु पाटबंधारे योजनांच्या कार्यक्रमावर भर देण्याचे शासनाचे धोरण असून त्या अनुषंगाने ५० राज्यस्तर लघु पाटबंधारे योजनांची कामे नव्याने हाती घेण्यात आली आहेत व या योजनांमुळे ३०,००० हेक्टर क्षेत्राची सिंचन निर्मिती होईल अशी अपेक्षा आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ या वर्षासाठी रुपये ५४.८३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

खारभूमी विकास योजना.

५५.१ युरोपियन अर्थसहाय्यित खारभूमी विकास प्रकल्प टप्पा-२ हा सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे या जिल्ह्यांकरिता ऑक्टोबर १९९८ पासून कार्यान्वित झाला आहे. सदर प्रकल्पासाठी आर्थिक करारानुसार सन २००५ पर्यंत सुमारे रुपये १५.५० दशलक्ष युरो एवढी रक्कम युरोपियन इकनॉमिक कम्यूनिटीकडून अनुदानाच्या स्वरुपात उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता राज्य शासनाचा रुपये १०.६६ कोटी एवढा सहभाग राहणार आहे.

५५.२ खारभूमी विकास कार्यक्रमांतर्गत एकूण ८० योजना असून त्याद्वारे एकूण ८,००० हेक्टर क्षेत्र पुनःप्रापित होणार आहे. खारभूमी योजनांच्या बांधकामाबरोबरच सदर कामात महिला विकास, बाल विकास, मत्स्योत्पादन, काही क्षेत्रात खारफुटीची लागवड व शेतकरी प्रशिक्षण अशा अनुषंगिक बाबीदेखील समाविष्ट आहेत.

५५.३ आतापर्यंत रुपये ५.२० कोटी एवढी रक्कम अनुदानाच्या स्वरुपात प्राप्त झाली आहे. सन २००२-०३ मध्ये या प्रयोजनार्थ रुपये २.१० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली असून सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ३६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

जलविद्युत प्रकल्प.

५६.१ चालू वर्षी चासकमान जलविद्युत प्रकल्पाव्दारे स्थापित क्षमतेत ३ मेगावॉट इतकी भर पडली आहे. घाटघर व शहानूर जलविद्युत प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २००३-०४ या वर्षामध्ये जलविद्युत प्रकल्पांसाठी रुपये. ३०१.६५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

२५० मेगॅवॉट क्षमतेचा घाटघर व ०.७५ मेगॅवॉट क्षमतेचा शहानूर हे जलविद्युत प्रकल्प अनुक्रमे सन २००४-०५ व सन २००२-०३ मध्ये कार्यान्वित होतील व त्यापासून अनुक्रमे वार्षिक ४६७ दशलक्ष व २.६८ दशलक्ष युनिटची वीजनिर्मिती होईल.

५६.२ २५ मेगावॉट स्थापित क्षमतेपर्यंतचे जलविद्युत प्रकल्प निजी वापरासाठी खाजगीकरणांतर्गत विकसित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

लाभक्षेत्र विकास कार्यक्रम.

५७. लाभक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत २६ मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या १८.९२ लक्ष हेक्टर लाभक्षेत्रापैकी १३.४९ लक्ष हेक्टर क्षेत्रात शेतचारी व शेतचा-याची कामे करण्यात आली आहेत. जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबादतर्फे शेतकरी प्रशिक्षण वर्ग नियमितपणे आयोजित केले जातात. सुमारे ७,५०० शेतकरी व १,६५० महिला शेतक-यांना सिंचन कृषिविषयी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच ५०,००० हेक्टर क्षेत्र पाणी वापर संस्थांकडे हस्तांतर करण्याचे नियोजित आहे. या कार्यक्रमाकरिता सन २००३-०४ या वर्षासाठी रुपये १८ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

पाणीपट्टी आकारणीत सवलत.

**५८.१** सन २००२-०३ पासून पाणीपट्टीची दंडनीय तिप्पट आकारणी रद्द करुन ती सामान्य दराच्या सव्वापट ते दीडपट लागू केली आहे. विहित मुदतीमध्ये देयके अदा करणा-यांना ५ टक्के सूट देण्यात आली आहे.

**५८.२** पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर होऊन शेतीच्या उत्पादनात व पाणीपट्टीच्या वसुलीत वाढ होऊन सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग होण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येत आहे.

जलविज्ञान प्रकल्प.

**५९.** ज्या खो-यात पाण्याची उपलब्धता कमी आहे व वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची मागणी सतत वाढत आहे, अशा खो-यांमध्ये दीर्घ मुदतीचे नियोजन करतांना पाणी उपलब्धता व वापर याची अचूक व विश्वासार्ह माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने जलविज्ञान प्रकल्प कार्यान्वित झालेला आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ या वर्षासाठी रुपये १०.७० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनीची स्थापना.

**६०.** मा. राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार राज्यातील अनुशेष दूर करण्यासाठी सर्व सिंचन महामंडळांकरिता एकत्रितरीत्या कर्जरोखे उभारणीसाठी महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनीची स्थापना दिनांक २७ सप्टेंबर २००२ रोजी करण्यात आली आहे.

सहकारी औद्योगिक वसाहतींना विशेष सवलती.

**६१.** सहकारी औद्योगिक वसाहतींमधील लघुउद्योगांना चालना देण्यासाठी शासनाने बिगर शेती करांमध्ये २/३ सूट, शासकीय जमिनीवरील भूखंडांच्या हस्तांतरण शुल्कात सवलत, शासकीय समभाग भांडवल व शासकीय हमीवर दिलेल्या कर्जावर ऑडीट फी माफी, शासकीय हमीविना स्थापन करण्यात येणा-या सहकारी औद्योगिक वसाहतींना प्रशासकीय मान्यता व समभाग भांडवल

वितरीत करण्याच्या कार्यपध्दतीचे सुलभीकरण व महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळाकडून २० टक्के समभाग भांडवल उभारण्याची सवलत अशा विशेष सवलती दिल्या आहेत. या प्रयोजनासाठी सन २००३-०४ करिता रुपये ७२.७५ लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

प्रोत्साहन अनुदानाचा अनुशेष दूर करणे.

**६२.** राज्यातील औद्योगिक घटकांना देय करण्यात आलेल्या विविध प्रोत्साहनांचा अनुशेष आहे. पॅकेज स्कीम ऑफ इन्सेंटिव्हज्च्या ज्या लाभार्थ्यांनी कालांतराने विक्रीकर देण्याचा विकल्प स्विकारला आहे त्यांना नक्त प्रचलित मूल्यांवर आधारित जी परतफेडीची सवलत देण्यात आली आहे त्याद्वारे या प्रयोजनासाठी निधी उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या निधीतून लघु व मोठ्या औद्योगिक घटकांचा प्रोत्साहनाचा अनुशेष सन २००३-२००४ मध्ये दूर करण्यात येईल.

मिडास अधिनियम.

**६३.** राज्याचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यास मदत करण्याकरीता खाजगी सहयोगाने उच्च दर्जाच्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मुलभूत सुविधा सहाय्य व विकास अधिनियम या नावाने नवीन अधिनियमाचा मसूदा तयार केलेला आहे. अधिनियमाचा हा मसूदा चालू अधिवेशनामध्ये विधीमंडळाच्या सभागृहापुढे चर्चेसाठी सादर करण्यात येईल.

विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम.

**६४.** विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये, विना-समस्यांचे वातावरण निर्माण होण्यासाठी आणि या क्षेत्रांचा नियोजनबध्द व जलद गतीने विकास होण्याकरीता महाराष्ट्र विशेष आर्थिक क्षेत्रे अधिनियम या नवीन कायद्याचा मसूदा शासनाने तयार केला आहे. या विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये येणा-या उद्योगधंद्यांना अनुकूल वातावरण निर्माण होण्यासाठी संबंधित उद्योगांच्या प्रस्तावांना जलद मंजू-या मिळणे व कार्यपध्दती सुलभ करणे याकरीता सदर प्रस्तावित कायदा आवश्यक कायदेशीर चौकट पुरवेल.

तयार कपडयांची संकूले, वाहनपूरक उद्योगांची संकूले, अन्न प्रक्रिया उद्याने, पुष्पोत्पादन उद्याने इत्यादीं विशेष आर्थिक क्षेत्रांबाहेरीलही विशिष्टरीत्या निश्चित केलेल्या क्षेत्रांमध्ये या प्रस्तावित अधिनियमांच्या तरतूदी लागू करता येतील आणि त्यामुळे महाराष्ट्राच्या स्पर्धात्मक स्थानास बळकटी येईल आणि गुंतवणूकदारांनाही त्यांनी अपेक्षित केलेले अनुकूल वातावरण प्राप्त होईल.

**अपारंपारिक उर्जा निर्मिती.**

**६५.** पर्यावरणाशी संतुलन राखण्याच्या दृष्टीने राज्याने अपारंपारिक व नित्य नूतनशील ऊर्जा क्षेत्रामध्ये बरीच प्रगती केली आहे. महाराष्ट्राने पवन ऊर्जा क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर गेली तीन वर्षे केलेल्या उल्लेखनीय प्रगतीमुळे भारताने जगातील पवन उर्जा निर्माण करणा-या राष्ट्रात पाचव्या क्रमांकाचे स्थान प्राप्त केले आहे हे नमूद करण्यास मला अभिमान वाटतो.

औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापनांनी वापरलेल्या विजेवर ग्रीन एनर्जी कर आकारण्यात येऊन या द्वारे निर्माण झालेल्या महसूलाचा उपयोग नित्यनूतनशील व अपारंपारिक उर्जा निर्मिती करिता वापरण्यात येईल. यासाठीचे विधेयक विधी मंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल.

**न्यायालयांची स्थापना.**

**६६.** राज्यातील न्यायालयीन दाव्यांची संख्या व जनतेचे हित लक्षात घेऊन पांढरकवडा, किल्लेधारुर, दोंडाईचा, बार्शी, म्हसवड व खेड येथे नवीन न्यायालये नुकतीच सुरु करण्यात आली आहेत.

**वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचा अनुशेष दूर करणे.**

**६७.** शासनाने लातूर व अकोला येथे दोन नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे या महाविद्यालयांमध्ये प्रत्येकी १०० जागा उपलब्ध होतील. त्यामुळे विदर्भ व मराठवाडा विभागातील जागांचा असलेला अनुशेष दूर होण्यास मदत होईल.

विदर्भ, मराठवाडा, कोकण विकासाचा विशेष कार्यक्रम.

**६८.** राज्यातील विविध विभागांचा संतुलित विकास साधण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. विदर्भ, मराठवाडा व कोकण या विभागांचा जलद गतीने विकास करण्यासाठी राज्य शासनाने सुधारित कार्यक्रम तयार केला असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे. या कार्यक्रमासाठी सन २००३-०४ च्या वार्षिक योजनेत विदर्भ, मराठवाडा व कोकण यासाठी अनुक्रमे रुपये २०,१५ व १४ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय सम विकास योजना.

**६९.** सन २००२-०३ मध्ये योजना आयोगाने राष्ट्रीय समविकास योजना नावाची योजना तयार केली आहे. या योजनेंतर्गत दारिद्रय व शेती उत्पादकता या निकषांच्या आधारावर निवड केलेल्या भंडारा व गडचिरोली जिल्ह्यांचा समावेश असून, या प्रत्येक जिल्ह्यास प्रतिवर्षी रुपये १५ कोटी इतका निधी पुढील ३ वर्षांमध्ये उपलब्ध होईल. या निधीचा विनियोग दुष्काळ निवारण, पायाभूत सुविधा, शिक्षण व आरोग्य, हातमाग, कृषि प्रक्रिया व माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील योजनांसाठी केला जाईल. या दोन्ही जिल्ह्यांच्या आराखडयास योजना आयोगाने मान्यता दिली आहे. या योजनेमुळे भंडारा व गडचिरोली या जिल्ह्यांच्या विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळेल.

रोजगार हमी योजना.

**७०.१** सन २००२-०३ या वर्षामध्ये रोजगार हमी योजनेकरिता रुपये ८५० कोटी इतकी तरतूद केली आहे व १५ कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्मिती झाली आहे.

**७०.२** राज्यातील टंचाई सदृश्य परिस्थितीमुळे सहजगतीने रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या पाटबंधारे, मृद व जलसंधारणाचे व रस्त्यांच्या कामांचे प्रचलित नियम काही प्रमाणात शिथिल केले आहेत. उदाहरणार्थ,

रस्त्यांच्या कामावरील खर्चाची मर्यादा ३० टक्क्यांवरुन ५० टक्क्यांपर्यंत वाढविली आहे. महात्मा ज्योतिबा फुले जलभूमि अभियानातंर्गत रोजगार हमी योजनेखाली मृद व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर घेतली आहेत.

**७०.३** रोजगार हमी योजने अंतर्गत कामावर दिनांक ८ मार्च २००३ रोजी १०,०६६ कामे चालू असून त्यावरील मजूर उपस्थिती ५,११,५९७ एवढी आहे. टंचाई सदृश्य जिल्हयांत रोजगार हमी योजना कामावरील मजुरांना त्यांच्या मजुरीचा भाग म्हणून प्रतिदिनी ५ किलो या प्रमाणात १ लक्ष मेट्रिक टन धान्य वाटप करण्यात आले आहे. नुकतेच १,१५,८०० मेट्रिक टन धान्य प्राप्त झाले असून त्याचे वाटप करण्यात येत आहे.

**७०.४** राज्य शासनाच्या नवीन धोरण व उपक्रमशीलतेचे उद्दिष्ट अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रमाद्वारे पूर्ण करण्याचे आहे. या अंतर्गत डिसेंबर २००२ पर्यंत रोजगार हमी योजनेची ७,४९१ अपूर्ण कामे व १०,१६३ जवाहर विहिरींची अपूर्ण कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

**७०.५** सन २००३-०४ मध्ये १६ कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्मिती होईल असा अंदाज आहे. या प्रयोजनासाठी सन २००३-०४ करिता रुपये ४७५.३२ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि, आवश्यकतेनुसार अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यास शासन कटिबद्ध आहे

रस्ते विकास कार्यक्रम.

**७१.१** राज्यातील सर्वसाधारण क्षेत्रातील एक हजारापेक्षा अधिक आणि डोंगरी अथवा आदिवासी क्षेत्रातील ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली खेडी बारमाही रस्त्यांने जोडण्याचा रस्ते विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दिनांक ३१ मार्च २००२ पर्यन्त २०,८४५ गांवापैकी २०,३५१

गांवे बारमाही रस्त्यांने जोडली गेली आहेत. प्रामुख्याने ग्रामीण भागातील १३,०९२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण व १,०५७ पुलांची कामे नाबार्डच्या अर्थसहाय्यातून हाती घेण्यात आलेली आहेत. आतापर्यन्त ९,२९६ किलोमीटर लांबीचे डांबरीकरण व ६९२ पुलांची कामे पूर्ण झालेली आहेत. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये १७९.६९ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**७१.२** रस्ते विकासाच्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी काही महत्वाचे प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून शासनाने हाती घेतले आहेत. खाजगीकरणांतर्गत करावयाच्या एकूण रुपये २०,७२३ कोटी किंमतीच्या ५२७ कामांपैकी सुमारे रुपये ३,६२६ कोटी किंमतीची १३५ कामे पूर्ण झालेली असून रुपये २,१५२ कोटींची १०९ कामे प्रगतीपथावर आहेत व रुपये १४,९४५ कोटी किंमतीची इतर २८३ कामे नियोजनाच्या वेगवेगळया टप्प्यावर आहेत. मुंबई-औरंगाबाद-नागपूर या ७०० किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे राष्ट्रीय महामार्ग दर्जाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. नागपूर, पुणे, औरंगाबाद व अमरावती या शहरांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत एकात्मिक रस्ते विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

जीवनदायी आरोग्य योजना.

**७२.** राज्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना गंभीर आजारावर उपचार करुन घेणे शक्य व्हावे म्हणून जीवनदायी आरोग्य योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे दारिद्र्य रेषेखालील लोकांना हृदयविकार, मुत्रपिंड रोपण, मेंदू व मज्जासंस्थांचे विकारावरील शस्त्रक्रियांसाठी प्रतिरुग्ण रुपये ७० हजारापर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेकरिता सन

२००३-०४ या वर्षासाठी रुपये ७ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प.**

**७३.** जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात कार्यान्वित असलेल्या महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत १४४ कामांपैकी ३६ कामे पूर्ण झालेली आहेत व उर्वरित कामे डिसेंबर २००४ अखेरीस पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे. या प्रयोजनाकरिता सन २००३-०४ या वर्षासाठी रुपये २०४.७५ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**यशवंत ग्राम समृद्धी योजना.**

**७४.** ऑगस्ट २००२ मध्ये सुरु करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण यशवंत ग्राम समृध्दी योजनेमध्ये ग्राम पंचायत व ग्राम सभांना स्वत:च्या निकडीनुसार सामुहिक मालकीची मालमत्ता निर्माण व विकसित करण्यासाठी गुंतवणूक करण्याचे अधिकार देऊन या प्रक्रियेत ग्रामस्थांना सहभागी होण्यास उद्युक्त करण्यात आले आहे. यासाठी सन २००२-०३ मध्ये रुपये ४२.५८ कोटींची तरतूद करण्यात आली होती. सदर योजनेला मिळालेला वाढता प्रतिसाद विचारात घेऊन शासनाने इतर स्त्रोतातून रुपये ११०.१९ कोटी इतका अतिरिक्त निधी वितरित केला आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ या वर्षासाठी रुपये ५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार यात वाढ करण्यात येईल.

**नेवासे परिसर विकास.**

**७५.** मानवतेचे भाष्यकार श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या अहमदनगर जिल्हयातील नेवासे परिसराचा विकास करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी सन २००३-०४ यावर्षामध्ये रुपये ७६.७८ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

इंदिरा आवास योजना.

**७६.** इंदिरा आवास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुक्त वेठबिगार, अन्य मागासवर्गीय व भटक्या जमातीच्या व्यक्तींना मोफत घरे उपलब्ध करुन दिली जातात. चालू आर्थिक वर्षामध्ये ८८,६२५ घरकुलांचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. त्यापैकी डिसेंबर, २००२ अखेर ३३,९७० घरकुले पूर्ण झाली असून ५८, ८५१ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. या बाबीवर डिसेंबर २००२ अखेर रुपये ९९.८३ कोटी इतका खर्च झालेला आहे. सन २००३-०४ मध्ये या प्रयोजनासाठी रुपये ११३.९३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना.

**७७.** केंद्र पुरस्कृत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ पासून राज्यभर पूर्णपणे एकात्मिक स्वरुपात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत रोजगाराचा भाग म्हणून मजूरांना दारिद्र्य रेषेखालील दराने ५ किलोग्रॅम धान्य प्रतिदिनी वाटप करण्यात येत असून उर्वरित मजूरी रोखीने प्रदान करण्यात येत आहे. अतिरिक्त रोजगार निर्मिती करुन धान्य सुरक्षा देणे हा या योजनेचा प्राथमिक उद्देश असून, ही योजना स्थानिक क्षेत्रात व आसपास अकुशल काम करण्यास तयार असलेल्या सर्व ग्रामीण गरजूंसाठी खुली आहे. सन २००३-०४ साठी रुपये ११२.१७ कोटी इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

लघु पाटबंधारे योजना.

**७८.** ० ते १०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेल्या लघु पाटबंधारे योजनांसाठी सन २००२-०३ मध्ये डिसेंबर २००२ अखेर रुपये २८.५० कोटी इतका खर्च झाला आहे. सन २००३-०४ करिता रुपये ८२.४३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

१०१ ते २५० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेल्या लघु पाटबंधारे योजनांसाठी सन २००२-०३ मध्ये डिसेंबर २००२ अखेर रुपये १०.१४ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये ४३.५२ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

इंडो-जर्मन अर्थसहाय्यित लघु पाटबंधारे योजनेंतर्गत सन २००३-०४ या वर्षाकरिता रुपये १८.२० कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प.

**७९.** मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून देशाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहे. त्यामुळे या महानगरात देशातील सर्व भागातील लोकांचे सातत्याने लोंढे येत असल्याने लोकसंख्येत वाढ होत आहे. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक व्यवस्थेकरीता मुलभूत सुविधा निर्माण करणेसुध्दा फार मोठी जटील समस्या आहे. असा अंदाज आहे की, दररोज बसने प्रवास करणाऱ्यांची संख्या ४१ लक्ष इतकी आहे. तर उपनगरीय रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या ही ५६ लक्ष इतकी आहे. भारतीय रेल्वे यांच्या सहकार्याने राज्य शासनाव्दारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्याचे ठरविण्यात आले आहे. या प्रकल्पाचा खर्च रुपये ४,५०० कोटी असून त्यास जागतिक बँकेकडून रुपये २,६०० कोटी इतक्या रकमचे कर्ज मिळणार आहे. या प्रकल्पात सर्वात मोठा घटक म्हणून उपनगरीय रेल्वे सेवेत सुधारणा करण्यासाठी रुपये ३,००० कोटी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या प्रकल्पांतर्गत सन २००३-०४ करिता रुपये ११० कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प.

८०. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पात रस्त्यांच्या मुलभूत सुविधांकरिता सुधारणा करण्याची पुरेशी व्यवस्था नाही. मागील चार दशकांपासून मुंबईच्या उपनगरात लोकसंख्या व वाहनांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे सध्या अस्तिवात असलेल्यञ रस्त्यांचे जाळे वाढत्या वाहतुकीची गरज भागविण्यास अपुरे पडत आहे. मुंबईतील रस्त्यांच्या मुलभूत सुविधेची भेडसावणारी समस्या विनिर्दिष्टपणे दूर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने एक महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून मुंबई नागरी मुलभूत सुविधा प्रकल्पाची निर्मिती केली आहे. या प्रकल्पाव्दारे रस्त्यांच्या मुलभूत सुविधेत सुधारणा करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत मुंबईतील उत्तर-दक्षिण रस्ते सुधारणे, उपनगरातील पूर्व-पश्चिम जोडरस्ते, उड्डाण पुलांचे बांधकाम, लेव्हल क्रॉसिंग येथील पुल, पादचारी मार्ग, फुटपाथ, उपनगरीय रेल्वे स्थानकाजवळ पादचा-यांचे व त्यांच्या सुरक्षेसाठी खास पादचारी सुविधा अंतर्भूत आहेत. या प्रकल्पाची प्रस्तावित्त किंमत रुपये २,००० कोटी राहिल. त्यापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारे त्यांच्या स्त्रोतातून रुपये १,००० कोटी ३ वर्षाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. उरलेली रक्कम उभी करण्यास हातभार लावण्याच्या उद्देशाने या योजनेकरिता सन २००३-०४ या वर्षामध्ये रुपये १०० कोटी इतकी तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे. मला विश्वास आहे की, मुंबई नागरी मुलभूत सुविधा प्रकल्प आणि मुंबई नागरी परिवहन प्रकल्प या दोन्ही प्रकल्पांच्या अंमलबजावणीनंतर भारताची वाणिज्यिक राजधानी असलेल्या मुंबईत जागतिक दर्जाच्या मुलभूत सुविधा उपलब्ध होतील. आमचे शासन येत्या ३ वर्षांत प्रकल्पाची प्रभाविरित्या अंमलबजावणी पूर्णपणे करण्यास कटिबध्द आहे. या प्रकल्पाचे

काम पूर्ण होईपर्यंत आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

चैत्यभूमी.

८१. मुंबई येथील दादर चैत्यभूमीचे पुनर्विकास व सौंदर्यीकरणासाठी राष्ट्रपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी शासनाने रुपये १० कोटी देण्याचे मान्य केले असून, सन २००२-०३ या वर्षात रुपये ५ कोटी एवढा निधी मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिला आहे. यापुढे देखील या प्रयोजनासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर काम दोन वर्षात पूर्ण करण्याचा पूर्ण प्रयत्न राहील, असे मी नमूद करु इच्छितो.

नागरी स्वराज्य संस्थांचे प्रशासन संगणकाद्वारे गतिमान करणे.

८२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होण्यासाठी नागरिकांना चांगली आणि त्वरित सेवा उपलबध करुन देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना समान आज्ञावली तंत्रज्ञान विकसित करुन देण्यात येत आहे. या आज्ञावलीचा संगणकाद्वारे उपयोग करुन घेता यावा याकरिता अ, ब व क वर्ग नगरपालिकांना अनुक्रमे ५० टक्के, ६५ टक्के व ७५ टक्के अनुदान देण्यात येईल या प्रयोजनार्थ सन २००३-०४ मध्ये रुपये ५ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

मागणी-धिष्ठित लोक सहभागावर आधारित पाणी पुरवठा.

८३. मागील तीन वर्षापासुन मागणीधिष्ठित लोक सहभागावर आधारित पाणी पुरवठा धोरण राज्य शासनाने स्विकारले आहे. ग्रामस्तरीय लोकशाही प्रक्रियेच्या दिशेने शासनाच्या ह्या प्रगतीशील धोरणाची परिणीती म्हणून जर्मन सरकारने के.एफ.डब्ल्यू. या वित्तीय संस्थेमार्फत तीन जिल्ह्यांसाठी रुपये १५३ कोटींच्या योजनांसाठी त्वरित आर्थिक सहाय्य मंजूर केले आहे. आता जागतिक बँकेने देखील २५ ग्रामीण जिल्ह्यांसाठी आर्थिक सहाय्याच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली असुन प्रकल्प मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४

मध्ये रुपये ४ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

लोक सहभागाव्दारे ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता.

८४. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छतेमध्ये लोकसहभागाद्वारे ग्रामस्तरीय नियोजन, अंमलबजावणी, देखभाल व दुरुस्ती करिता राज्याने स्वजलधारा धोरण स्विकारले आहे. गेल्या ३ वर्षांपासून हे धोरण संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. राज्यातील जनतेकडून या योजनेकरीता उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून प्रकल्प किंमतीच्या १० टक्के इतकी रक्कम लोकवर्गणीच्या स्वरुपात जमा होत आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ या वर्षाकरीता रुपये १८७.४१ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे.

पिण्याच्या पाण्याची टंचाई.

८५. सन २००२-०३ या वर्षात पडलेल्या अपुऱ्या व अनियमित पावसामुळे राज्यातील बऱ्याच गावांना व शहरांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ त्रैमासिक टंचाई कृती आराखडे तयार करुन त्या अनुषंगाने नवीन विंधन विहिरी घेणे, जुन्या विंधन विहीरींची विशेष दुरुस्ती, नळ योजनांची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पूरक योजना, विहिरीतील गाळ काढणे व त्या खोल करणे, खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे, टँकर, बैलगाडीने पाणी पुरवठा करणे व बुडक्या खोदणे अशा उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. सन २००२-०३ या आर्थिक वर्षात या प्रयोजनार्थ रुपये १००.०२ कोटी व रुपये १२ कोटी खर्च अनुक्रमे ग्रामीण व नागरी भागावर झालेला आहे. सन २००३-०४ मध्ये देखील यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरीलप्रमाणे परिस्थिती असतांना देखील मला सांगण्यास अभिमान वाटतो की, १३,९०२ गावे व वाड्यांचा व ८५ शहरांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आला आहे. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या साडेतीन वर्षात रुपये ९,४८९ कोटी खर्चाच्या

तुलनेत राज्याने मागील साडेतीन वर्षांच्या कालावधीत रुपये ४,५६१ कोटी एवढा एकूण खर्च केला आहे. या प्रयोजनार्थ सन २००३-०४ करिता रुपये ३७६.५७ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान.

८६. राज्यात मागील दोन वर्षापासून राबविण्यात येत असलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाला मिळालेला ग्रामीण जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद पाहून ही योजना राज्यातील नागरी भागात संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान या नावाने दिनांक १४ नोव्हेंबर २००२ पासून राबविण्यात येत आहे. स्वच्छ नागरी भागांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. सदर अभियानाला देखील नागरी जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेकरीता सन २००३-०४ करीता रुपये १० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

नोंदणी व मुद्रांक विभाग.

८७. नोंदणी व मुद्रांक विभागाचे संपूर्ण संगणकीकरण पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र राज्य हे याबाबत आद्यप्रवर्तक असून आता या पध्दतीचे अनुकरण इतर राज्यांनी देखील सुरु केले आहे. १९८५ पासून प्रलंबित असलेल्या दस्तांचे अभिलेख जतन करण्याचे काम स्कॅनिंगच्या माध्यमातून एक वर्षाच्या आत पूर्ण करुन सर्व मूळ दस्त संबंधित व्यक्तींना परत करण्यात येतील. सदर योजना राज्यातील जनतेला अतिशय फायद्याची ठरेल.

वस्त्रोद्योग क्षेत्रातील कौशल्यवाढ.

८८. राज्यातील वस्त्रोद्योग प्रामुख्याने सोलापूर, मालेगाव, भिवंडी, नागपूर व इचलकरंजी अशा शहरांमध्ये केंद्रित झालेला आहे. सद्यःस्थितीत हॅन्डलूम व पॉवरलूम कारखान्यांमध्ये तयार करण्यात येत असलेल्या कापडांना विशेष भाव मिळत नसल्यामुळे मंदीचे सावट या क्षेत्रामध्ये दिसून येते. अशा परिस्थितीत संबंधित कारखान्यांमार्फत रेडीमेड गारमेंट व होजियरी उद्योग उभा

राहिल्यास या उद्योगाला उर्जितावस्था प्राप्त होईल. पर्यायाने कपड्यांपासून गारमेंटचे रुपांतर झाल्यामुळे व्हॅल्यू ॲडिशन होईल तसेच नवीन रोजगार निर्मिती देखील होईल. शासनाने अशा त-हेचे प्रशिक्षण प्रकल्प राबविणाऱ्या नागरी संस्थांना उत्तेजन देण्याचे ठरविले असून प्रस्तुत कार्यक्रमामध्ये महिला, मागासवर्गीय, कुशल कामगार यांना त्यांचे कौशल्य वाढीसाठी प्राधान्य देण्यात येईल. इचलकरंजी नगरपालिकेमध्ये प्रायोगिक तत्वावर या वर्षी हा उपक्रम सुरु करण्यात येईल.

तसेच सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना या योजनेशी वरील कार्यक्रमाची सांगड घालण्यात येईल.

श्री. राजश्री शाहू महाराज यांच्यावर चित्रपट.

८९. महाराष्ट्रात सामाजिक व ऐतिहासिक क्षेत्रात कामगिरी बजाविणाऱ्या थोर व्यक्तिमत्वांच्या जीवनावर चित्रपट तयार करण्याच्या योजनेअंतर्गत राजश्री शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपट तयार करण्यासाठी रुपये ५० लाखांचे अर्थसहाय्य दिले आहे.

अल्पबचत वेबसाईट.

९०. अल्पबचत अभिकर्त्यांना व गुंतवणुकदारांना अल्पबचतीच्या सर्व योजनांची तपशीलवार माहिती देण्यासाठी वेबसाईट तयार करण्याचे ठरविलेले असून ही वेबसाईट गतीशील व परस्पर क्रियाशील असणार आहे, ज्यात अभिकर्त्यांसाठी निरनिराळे फॉर्म्स, योजनांचे अद्यावत दर, परिणामी दर व इतर वित्तीय संस्थांच्या योजनांशी तुलनात्मक दर यांची अद्यावत माहिती उपलब्ध होईल. या वेबसाईटद्वारे प्रत्येक अभिकर्त्यास एकमेव सांकेतीक ओळख क्रमांक देऊन त्यांच्यासाठी त्यांचा गुंतवणुकीचा तपशील ठेवण्याचे सॉफ्टवेअर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे व या वेबसाईटद्वारे अभिकर्ते गुंतवणूकदारांसाठी कर नियोजन करु शकतील.

**आता मी अर्थसंकल्पाच्या भाग-दोनकडे वळतो.**